१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, बुधवार १७ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०४, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 104 Marathi - Daily - Mumai, 17 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

RSS च्या नोंदणीचा वाद काय आहे?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## हवाईदलाच्या विमानाने नीट प्रश्नपत्रिका पाठवल्या

### टेलिग्रामही २२ जूनपर्यंत बंद



**राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-यूजी) २०२६ ची रविवारी २१ जून रोजी फेरपरीक्षा आहे. या परीक्षेत पेपरफुटी होऊ नये म्हणून केंद्र सरकारने अजब निर्णय घेतले आहेत. अकोला व अमरावती येथे नीटच्या प्रश्नपत्रिका हवाईदलाच्या विमानाने पाठवण्यात आल्या. इतकेच नव्हे तर टेलिग्राम प्लॅटफॉर्मवर २२ जूनपर्यंत पूर्ण बंदी आणली आहे. टेलिग्रामवरील मेसेज एडिटिंग सुविधा ३० जूनपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**


■ नवी दिल्ली

**केंद्र सरकारच्या** या कृतीवर जोरदार टीका होत आहे. आधीच्या नीट परीक्षेचे जे पेपर फुटले ते केंद्रावर नेताना फुटले नाहीत. हे पेपर तयार करण्याची जबाबदारी असलेल्या एनटीए मधील अधिकाऱ्यांनीच हे पेपर फोडले असे उघड झाले आहे. त्यामुळे पान ७ वर

# उबाठाचे ४ खासदार दिल्लीत! एकनाथ शिंदेही रवाना

# वर्धापन दिनाआधीच 'ऑपरेशन टायगर' होणार

■ मुंबई



**राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना उधाण आले असताना उबाठातील चार खासदार तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची माहिती आहे. उबाठा गटाचे यवतमाळचे खासदार संजय देशमुख आणि परभणीचे संजय जाधव हे विशेष खासगी विमानाने दिल्लीला गेले आहेत. नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हे राजधानी एक्स्प्रेसने दिल्लीला पोहोचले. शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हेदेखील दिल्लीत दाखल झाले आहेत. तर हिंगोलीचे खासदार नागेश आष्टीकर आणि धाराशीवचे खासदार ओमराजे निंबाळकर नॉट रिचेबल झाले आहेत. या खासदारांपाठोपाठ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही खासगी विमानाने दिल्लीला रवाना झाले. त्यामुळे शिवसेनेच्या वर्धापन दिनाआधीच ऑपरेशन टायगर पार पडणार, असे म्हटले जात आहे. कदाचित उद्याच स्वतंत्र गटाचे पत्र दिले जाण्याची शक्यता आहे.**



**उबाठा** प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षातील संभाव्य फूट टाळण्यासाठी दोनच दिवसांपूर्वी पक्षाच्या सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला एकूण पाच खासदार अनुपस्थित होते. ते ऑनलाईन या बैठकीला उपस्थित होते, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. या खासदारांनी अनुपस्थित राहण्याची वेगवेगळी कारणे दिली होती. आज संजय देशमुख आणि संजय जाधव हे संध्याकाळी नांदेड विमानतळावरून विशेष विमानाने एकत्र दिल्लीला रवाना झाले. त्यानंतर त्यांचे मोबाईल बंद झाले. त्यांचे स्वीय सहायक आणि सुरक्षा रक्षकांचे फोनही बंद झाले. खा. जाधव यांनी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी नागेश आष्टीकर यांची स्वाक्षरी घेतल्याचे सांगितले जात आहे. राजाभाऊ वाजे यांनी आपण आज संसदीय समितीच्या बैठकीला दिल्लीला जाणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार ते राजधानी एक्स्प्रेसने दिल्लीला गेले. मात्र, १९ जूनला उबाठाच्या वर्धापनदिनाला उपस्थित राहाणार का, असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले की, दिल्लीतून परतल्यावर माझ्या मतदारसंघात जाणार आहे. तिथे माझे काही कार्यक्रम आहेत. भाऊसाहेब वाकचौरे आधी अज्ञात स्थळी गेल्याचे सांगितले जात होते. नंतर ते दिल्लीत असल्याचे सांगण्यात आले.

उबाठाच्या एकूण १० खासदारांपैकी ७ खासदार बंड करण्याच्या तयारीत आहेत. ते उद्याच आपला नवा गट स्थापन करून, तसे पत्र लोकसभाध्यक्षांना देणार आहेत, अशी माहिती आहे. येत्या १९ जून रोजी शिवसेना पक्षाचा स्थापनादिन आहे. या दिवसाच्या अगोदरच हे सर्व खासदार आपला वेगळा गट स्थापन करणार आहेत, असे बोलले जात आहे. मराठवाड्यातील उबाठाचे एक खासदार नंतर फुटीर खासदारांत सहभागी होतील, अशीही माहिती आहे. ही संभाव्य फूट टाळण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्याकडून प्रयत्न केले जात आहेत. चर्चांना वेग आल्यानंतर उबाठाचे खासदार अनिल देसाई आणि संजय राऊत हे दिल्लीत तळ ठोकून आहेत. मात्र, गटनेते अरविंद सावंत अद्याप दिल्लीला पोहोचलेले नाहीत. उद्धव ठाकरे यांनी पान ७ वर

## महिला बचत गटांना एक हेक्टर जमीन

■ मुंबई

**राज्यातील** महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. महसूल विभागाच्या मालकीच्या पडीक जमिनींचा उपयोग करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने पात्र महिला बचत गटांना प्रत्येकी एक हेक्टर (सुमारे अडीच एकर) जमीन पाच वर्षांच्या भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदानही दिले जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

महसूल विभागाकडे मोठ्या प्रमाणात अशा जमिनी आहेत, ज्या सध्या पडीक असून, आगामी काळात कोणत्याही शासकीय प्रकल्पासाठी वापरल्या जाण्याची शक्यता कमी आहे. या जमिनींवर अनेकदा अतिक्रमण होत असल्याने त्यांचा उत्पादनक्षम वापर करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून पान ७ वर



## पुणेकरांवर तिसऱ्यांदा भुर्दंड सीएनजी-पीएनजी दरवाढ

■ पुणे

**पुण्यात** सीएनजी आणि घरगुती पीएनजीच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) यांनी मध्यरात्रीपासून नवे दर लागू केले असून, सीएनजीच्या दरात प्रति किलो १ रुपयांची, तर घरगुती पीएनजीच्या दरात ८५ पैशांची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीनंतर पुण्यात सीएनजीची किंमत ९५.७५ रुपये प्रति किलो झाली आहे. तर घरगुती पीएनजीचा दर ५१.५० रुपये प्रति युनिटवर पोहोचला आहे. नैसर्गिक वायूच्या खरेदी खर्चात वाढ झाल्यामुळे दरवाढ करावी लागल्याचे एमएनजीएलकडून सांगण्यात आले आहे.

गेल्या काही आठवड्यांतील ही सीएनजीच्या दरातील तिसरी वाढ आहे. यापूर्वी ८ मे रोजी सीएनजीच्या दरात प्रति किलो १.५० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर २८ मे रोजी आणखी २.५० रुपयांनी दर वाढविण्यात आले होते. आता पुन्हा १ रुपयांची वाढ झाल्याने वाहनचालकांच्या खर्चात वाढ होणार आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, तळेगाव, चाकण आणि हिंजवडी परिसरात हे नवे दर पान ७ वर

## डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय आता कफ सिरप मिळणार नाही

■ नवी दिल्ली

**देशात** आणि आफ्रिकेत कफ सिरप प्यायल्याने काही मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटनांनंतर सावधगिरी म्हणून केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने आज शासननिर्णय जारी करत डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याचे औषध विकण्यास बंदी घातली आहे. मंत्रालयाने अधिसूचना जारी करीत 'शेड्युल के' औषधांच्या यादीतून कफ सिरप हा शब्द वगळण्यास सांगितले आहे. 'शेड्युल के' मध्ये असलेली औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय थेट विकता येतात. कफ सिरप 'शेड्युल के'मधून काढण्याचा अर्थ यापुढे कोणतेही कफ सिरप आपल्याला नोंदणीकृत डॉक्टरच्या स्वाक्षरीसह चिठ्ठीशिवाय विकत घेता येणार नाही. या अधिसूचनेचा मसुदा मंत्रालयाने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये जारी करून औषध विक्रेत्यांकडून हरकती मागवल्या होत्या. त्यानंतर आता अंतिम अधिसूचना काढण्यात आली आहे.






# आयपीओ म्हणजे खासगी कंपन्यांना विक्री नव्हे! महावितरणचा खुलासा

■ मुंबई

**'नवाकाळ'च्या** १६ जूनच्या अंकात 'महावितरण खासगी कंपन्यांना विकण्याची तयारी ! निविदा जारी' हे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले आहे. या संदर्भात महावितरणने खुलासा केला आहे की, महावितरणने भांडवली बाजारातून निधी उभा करण्यासाठी राज्य शासनाच्या परवानगीने इनिशिअल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) द्वारे काही समभागांची विक्री होणार असून समभाग विक्री म्हणजे खासगी कंपन्यांना महावितरणची विक्री नव्हे.

कोणत्याही कंपनीची विक्री होण्यासाठी त्या कंपनीच्या समभागांपैकी किमान ५१ टक्के समभागांची विक्री होणे गरजेचे असते. महावितरणच्या आयपीओमध्ये कंपनीच्या मूल्यांकनापैकी खूप कमी टक्के किमतीच्या समभागांची विक्री होणार आहे. या विक्रीतून साडेसात हजार ते दहा हजार कोटी रुपयांचा निधी उभा राहणे अपेक्षित आहे. परिणामी राज्य सरकारची एमएसईबी होल्डिंग कंपनीमार्फत या कंपनीवरील सध्याची मालकी कायमच राहणार आहे.

महावितरणमध्ये कार्यरत हजारो अधिकारी व कर्मचारी यांच्या नोकरीवर आयपीओमुळे संकट येईल, हे पूर्णपणे चुकीचे आहे. या आयपीओच्या प्रक्रियेत अधिकारी व कर्मचाऱ्यांना एम्प्लॉई स्टॉक ऑप्शनच्या माध्यमातून समभाग मिळणार असून ते एका अर्थाने कंपनीच्या मालकांपैकी एक होणार आहेत.

# डी.वाय.पाटील हॉस्पिटलमध्ये १२ मणक्याच्या यशस्वी शस्त्रक्रिया

■ कोल्हापूर

**डी. वाय.** पाटील हॉस्पिटल, कोल्हापूर येथे 'द स्पाईन फाऊंडेशन, मुंबई'च्या सहकार्याने आयोजित मणका तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १२ व १३ जून रोजी पार पडलेल्या या विशेष शिबिरात १२ रुग्णांवर मणक्याच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १३६ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली.

हॉस्पिटलमध्ये गेल्या पाच वर्षांपासून 'द स्पाईन फाऊंडेशन'च्या सहकार्याने मणक्याच्या आजारांवरील विशेष ओपीडी सुरू असून १५०० हून अधिक गरजू रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. यातील गंभीर रुग्णांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. मोफत स्पाईन सर्जरी करणारे हे केंद्र गडचिरोलीनंतर देशातील दुसरे मोठे केंद्र ठरल्याचेही डॉक्टरांनी सांगितले. या शिबिरात कोल्हापूरसह सांगली, मिरज, सिंधुदुर्ग, निपाणी आदी भागांतील रुग्णांनी सहभाग घेतला. काही रुग्णांवर यापूर्वी शस्त्रक्रिया होऊनही त्रास कायम असल्याने त्यांच्यावर पुन्हा यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जन्मतः कुबड असलेली १४ वर्षीय मुलगी, मानेतील मज्जारज्जू दबलेले ८६ वर्षीय वृद्ध तसेच हालचाल करण्यास अडचण असलेल्या रुग्णांचा समावेश होता. महागड्या खासगी उपचारांच्या तुलनेत या शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्याने गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला. तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने डॉ. शेखर भोजराज यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया केल्या.

# माध्यम व कायदेतज्ज्ञ म्हणून स्मिता चिपळूणकर यांचा गौरव

■ मुंबई



**माध्यम** आणि कायदे क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत माध्यम व कायदेतज्ज्ञ म्हणून ॲड. स्मिता चिपळूणकर यांना भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाचे माननीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या माध्यम क्षेत्रातील प्रभावी कार्य, कायदेविषयक प्रगल्भ ज्ञान आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव मानला जात आहे. पुरस्कार स्वीकारताना ॲड. स्मिता चिपळूणकर यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, सहकारी आणि समाजाच्या विश्वासाला समर्पित असल्याची भावना व्यक्त केली.

# देगलूरचे नगरसेवक गोव्यात मौजमजेचा व्हिडिओ व्हायरल

■ नांदेड

**विधान** परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना देगलूर नगर परिषदेतील सत्ताधारी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नगरसेवकांचा गोवा दौरा चर्चेचा विषय ठरला आहे. गोव्यातील समुद्रकिनाऱ्यावर मौजमजा करतानाचे त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'वंचित बहुजन आघाडी'ने गायब झाल्याप्रकरणी वंचित बहुजन आघाडीने निवडणूक निरीक्षकांकडे सखोल चौकशीची मागणी केली होती.

विधान परिषद निवडणुकीदरम्यान मतांचे विभाजन होऊ नये, यासाठी नगरसेवकांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्याच्या राजकीय रणनीतीचा भाग म्हणून हा दौरा आयोजित करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. देगलूर नगरपरिषदेत सध्या राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असून, त्यांचे १५ नगरसेवक, नगराध्यक्ष आणि तीन स्वीकृत सदस्य आहेत.

# 'आधार'हा नागरिकत्वाचा पुरावा नाही याचिकेवर सुप्रीम कोर्टाची सरकारला नोटीस

■ नवी दिल्ली

**हल्ली** प्रत्येक सरकारी कामात आधार कार्ड हा पुरावा आधार कार्ड हे फक्त व्यक्तीचे ओळखपत्र आहे. ते नागरीकत्वाचा , वास्तव्याचा, राहाण्याच्या ठिकाणाचा किंवा जन्म तारखेचा पुरावा नाही, असा दावा करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणीस आली.न्यायालयाने याचिकाकर्त्याची बाजू समजून घेतल्यानंतर केंद्र आणि सर्व राज्य सरकारे तसेच निवडणूक आयोगाला नोटीस पाठवून याबाबत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले.

ॲड. अश्विनीकुमार उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे.सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. व्ही मोहना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.

ओळखपत्राच्या व्यतिरिक्त अन्य अनेक कारणांसाठी आधार कार्डाचा पुरावा म्हणून वापर केल्याने आधार कायदा - २०१६ तील कलम ९ चा भंग होतो.या कलमामध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे की, आधार कार्ड हा नागरिकत्वाचा, वास्तव्याचा पुरावा नाही,असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला आहे.

या अधिसूचनेमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, आधार हे फक्त एक ओळखपत्र आहे.

# १८ जूनपासून बेस्ट कर्मचारी आंदोलन बस व वीजसेवा बंद करण्याचा इशारा

■ मुंबई

**बेस्ट** प्रशासन, मुंबई महापालिका आणि राज्य सरकारकडून कामगार व प्रवाशांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत बेस्टमधील सर्व प्रमुख कामगार संघटनांनी एकत्र येत १८ जूनपासून आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनाचा फटका बेस्टची बस सेवा आणि वीजपुरवठा यांना बसण्याची शक्यता आहे.

बेस्टमधील निर्णय हे कामगार आणि प्रवाशांच्या हिताऐवजी कंत्राटदारांच्या फायद्यासाठी घेतले जात आहेत, असा आरोप करत कामगार संघटनांनी बेस्टचा अर्थसंकल्प मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करणे, निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी एकरकमी देणे, सातव्या वेतन आयोगानुसार वेतनवाढ लागू करणे, कंत्राटीकरण रद्द करणे, बेस्टच्या मालकीच्या ५ हजार बस खरेदी करणे, रिक्त पदांची भरती करणे आणि बेस्टच्या मालमत्ता विक्रीला विरोध अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

# मुंबईत २० जूननंतर आणखी पाणीकपातीत वाढ होणार



■ मुंबई

**मुंबईला** पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांतील पाणीसाठा १०.७२ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्यात मान्सून लांबल्याने पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे २० जूननंतर सध्या सुरू असलेल्या दहा टक्के पाणीकपातीत आणखी दहा टक्के कपात करण्याचा विचार पालिका प्रशासन करीत आहे. पावसाचा अंदाज घेऊन, हा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. असे झाल्यास मुंबईकरांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांत १५ जून रोजी फक्त १०.७२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणातील पाणीसाठा व राज्य सरकारने उपलब्ध करुन दिलेला राखीव पाणीसाठा जुलै अखेरपर्यंत मुंबईची तहान भागवेल इतका आहे. मात्र,पुढील काही दिवसांत पाऊस पडलाच नाही तर आणखी परिस्थिती गंभीर होईल. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी मुंबई महापालिकेने तयारी केली आहे. उन्हाच्या तडाख्यामुळे बाष्पीभवन होत असल्याने धरणातील पाण्याची पातळी कमी होत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू केली आहे.

# पवई तलाव परिसराच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

■ मुंबई

**उत्तर** मुंबईतील पवई तलावाच्या दक्षिण बाजूला आदि शंकराचार्य मार्गालगत परिसराचा गेल्या १८ वर्षांपासून रखडलेल्या पुनर्विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या पुनर्विकास आराखड्यासाठी १.८५ कोटी रुपये खर्चाचा सल्लागार प्रस्ताव तयार करून सल्लागार कंपनी 'एईकॉम आशिया' ची नियुक्ती प्रस्तावित केली आहे. तब्बल १.८ किमी लांबीच्या या पदपथाचा पुनर्विकास आणि परिसराचे सुशोभीकरण मेट्रो व मलवाहिनीचे काम पूर्ण होताच हाती घेण्यात येणार आहे.

या सल्लागार प्रस्तावासाठी सार्वजनिक निविदा प्रक्रियेतून सूट देण्याची मागणी करण्यात आली आहे. या परिसराचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण करण्यात आल्यानंतर पर्यटकांसाठी तिकीट आकारणी करण्यात येणार आहे.

# गिरगाव परिसरातील शिधावाटप कार्यालय महालक्ष्मीला हलवले

**स्थानिक नागरिकांत नाराजीचा सूर**

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील गिरगाव परिसरातील शिधावाटप कार्यालय महालक्ष्मी येथे स्थलांतर करण्यात आले आहे. मात्र यामुळे सुमारे साडेबारा हजार कार्डधारक ज्येष्ठ नागरिक,महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना लांबचा प्रवास करावा लागत असल्याने हे शिधावाटप कार्यालय मूळ गिरगावात पुन्हा सुरू करावे अशी मागणी शिवसेनेचे माजी नगरसेवक आणि दक्षिण मुंबईतील विभाग प्रमुख दिलीप नाईक यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलीप नाईक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यासंदर्भात नागरी पुरवठा विभागाचे संचालक चंद्रकांत डांगे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, विधानसभा मतदारसंघनिहाय पुनर्रचनेचे कारण देत हे स्थलांतर करण्यात आले असले तरी गिरगावचे कार्यालय हे मलबार हिल विधानसभा क्षेत्रातच येत आहे. गिरगावकरांना महालक्ष्मी येथे पाठवून त्याच जागेवर मुंबादेवी मतदारसंघातील दाणा बंदर, मशीद बंदर, डोंगरी, उमरखाडी, कामाठीपुरातील नागरिकांना सेवा उपलब्ध करून दिली. मुंबादेवी मतदारसंघासाठी स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यास हरकत नसली तरी गिरगावकरांवर अन्याय होता कामा नये. कारण गिरगाव, ठाकूरद्वार, मुगभाट,भटवाडी आणि ऑपेरा हाऊस परिसरातील सुमारे १२ हजार ५०० शिधापत्रिकाधारक कुटुंबांना आता किरकोळ कामांसाठीही महालक्ष्मी येथे जावे लागते.

# राज्यात २० जूननंतर पाऊस पंजाबराव डख यांचा अंदाज

■ मुंबई

**राज्यात** शनिवार २० जूननंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून जूनच्या शेवटच्या आठवड्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. तापमानातही घट होणार असून शेतकऱ्यांच्या पेरण्यांना गती मिळण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

पंजाबराव डख यांच्या मते, २० जूनपर्यंत राज्यात उष्णतेची लाट कमी होईल. विदर्भाच्या दिशेने पाऊस सक्रिय होईल आणि त्याचा परिणाम संपूर्ण महाराष्ट्रावर दिसून येईल.सर्वप्रथम पूर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांत पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पश्चिम विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाचा विस्तार होईल.राज्यातील सर्व भागांत एकाच वेळी पाऊस पडणार नसला तरी २१ जून ते २ जुलैदरम्यान टप्प्याटप्प्याने चांगला पाऊस होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात सुरू होतील. जूनच्या अखेरीस बहुतांश भागांत पेरणीची कामे वेगाने सुरू होतील.



समुद्रात फेकलेला कचरा पुन्हा किनाऱ्यावर आल्याने मुंबईतील जुहू बीचवर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे (छाया: दीपक साळवी)

# उबाठा नगरसेवक दीपक सावंत अडचणीत

**जात प्रमाणपत्र रद्द**

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेतील उबाठाचे नगरसेवक दीपक राजाराम सावंत यांना जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणात मोठा धक्का बसला आहे. सावंत यांनी सादर केलेले कुणबी-८३ जातीचे प्रमाणपत्र रत्नागिरी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरवत त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

दीपक सावंत यांनी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक १११ मधून कुणबी प्रवर्गाच्या जागेवरून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत ते विजयीही झाले होते. भाजपाच्या उमेदवार सारिका पवार यांनी त्यांच्या जात दाव्यावर आक्षेप घेत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर रत्नागिरी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीसमोर सविस्तर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान सावंत यांच्या पूर्वीच्या कागदपत्रांमधील हिंदू-मराठा अशा नोंदी समितीसमोर सादर करण्यात आल्या. या नोंदी आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे समितीने त्यांचा कुणबी जातीचा दावा ग्राह्य धरला नाही. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष शंकर बर्गे, उपायुक्त रवींद्र कदम आणि संशोधन अधिकारी शीतल सोनटक्के यांच्या त्रिसदस्यीय समितीसमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

# रोहित पवारांचे उपोषण संपताच भाजपाकडून गोमूत्र शिंपडून निषेध

■ सोलापूर



**राष्ट्रवादी** शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकरी कर्जमाफीच्या अध्यादेशात सुधारणा करण्याच्या मागणीसाठी पंढरपूर येथे दोन दिवस उपोषण केले होते. त्यानंतर भाजपा कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी गोमूत्र आणि चंद्रभागा नदीचे तीर्थ शिंपडून शुद्धीकरण केल्याने नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे.

रोहित पवार यांच्याशी राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी उपोषण स्थळावर जाऊन चर्चा केली होती. मुख्यमंत्री यांच्यासोबत २२ जूनपूर्वी बैठक आयोजित करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर रोहित पवार यांनी उपोषण मागे घेतले. मात्र भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर आणि भाजपा कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी गोमूत्र व चंद्रभागेचे तीर्थ शिंपडून शुद्धीकरण केले. सरकारी कारखाने, बँका आणि दूध संघ डबघाईला आणणाऱ्या लोकांच्या आंदोलनामुळे विठ्ठलाची पंढरी अशुद्ध झाली होती.

# भीमाशंकर देवस्थानाचा निर्णय व्हीआयपी दर्शन व्यवस्था बंद

■ पुणे

**बारा** ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर देवस्थानाने दर्शन व्यवस्थेबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे मंदिरात कोणत्याही व्हीआयपी व्यक्तीसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था उपलब्ध राहणार नसून सर्व भाविकांना समान नियमांच्या आधारे दर्शन घ्यावे लागणार आहे. तसेच ऑनलाइन बुकिंगशिवाय मंदिर परिसरात दर्शनासाठी प्रवेश दिला जाणार नसल्याचे देवस्थान प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

भीमाशंकर देवस्थान प्रशासन आणि जिल्हा प्रशासन यांच्यात झालेल्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच इतर व्हीआयपी व्यक्तींना मिळणाऱ्या विशेष दर्शन व्यवस्थेला पूर्णविराम मिळाला आहे.

# चांदिवली येथे मोफत शिक्षण वेदव्यास फ्लेवीज स्कूलचे उद्घाटन

■ मुंबई



**चांदिवली** येथील सफेद पूल परिसरात पंचशील महिला मंडळाच्या माध्यमातून लहान मुलांना मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या वेदव्यास फ्लेवीज प्री स्कूलचे उद्घाटन करण्यात आले. या शाळेचे उद्घाटन माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांच्या हस्ते संपन्न झाले. या सामाजिक उपक्रमाची संकल्पना व पुढाकार मनाली सुभाष गायकवाड यांनी घेतला असून कार्यक्रमात उपस्थित मान्यवर व नागरिकांचे स्वागत सुभाष गायकवाड यांनी केले.

या प्रसंगी शिक्षण तज्ञ रवि नायर, ॲड. अमोल मातेले, बाबू बत्तेली, लॉरेन्स बाबा डिसोझा, सुनील जैन, सूर्या गौडा, ॲड. कैलास आगवणे, कृष्णा नलावडे, अजय शुक्ला, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी अनिल गलगली म्हणाले की, समाजातील प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचणे ही काळाची गरज असून मोफत शिक्षणाची संकल्पना सामाजिक समतेचा पाया मजबूत करते.

# पूंछमध्ये भूस्खलनाने महामार्ग बंद २०० हून अधिक वाहने अडकली

■ जम्मू

**जम्मू-काश्मीरमधील** पूंछ जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सततच्या पावसामुळे पूंछला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १४४ (एनएच-१४४) वरील लसाना परिसरात अचानक मोठे भूस्खलन झाले. या घटनेमुळे महामार्ग पूर्णपणे बंद होऊन वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. रस्ता बंद झाल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजूंना २०० हून अधिक लहान-मोठी वाहने अडकून पडली.

अचानक झालेल्या भूस्खलनामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली असून अनेकांना तासनतास वाहनांमध्येच थांबावे लागले. भूस्खलनाची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन आणि सीमा रस्ते संघटना (बीआरओ) यांची पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. मुसळधार पाऊस सुरू असतानाही बीआरओच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर ढिगारा हटवण्याचे काम केले. अखेर सुमारे पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रस्त्यावरील माती आणि दगडांचा ढिगारा हटवण्यात यश आले.

# मेहकर पालिकेत मविआचे वर्चस्व काँग्रेसच्या ९ नगरसेवकांचा पाठिंबा

■ बुलडाणा

**बुलडाणा** जिल्ह्यातील मेहकर नगरपालिकेत महाविकास आघाडीने आपले वर्चस्व आणखी मजबूत केले आहे. काँग्रेसच्या ११ पैकी तब्बल ९ नगरसेवकांनी नगराध्यक्ष किशोर गारोळे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. या निर्णयामुळे नगरपालिकेतील सत्तासमीकरणात मोठा बदल झाला असून महाविकास आघाडीचे संख्याबळ १६ वर पोहोचले आहे.

याबाबत घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे राज्य सरचिटणीस श्याम उमाळकर यांनी पत्रकार परिषदेत केली. ९ नगरसेवकांच्या स्वाक्षरीयुक्त समर्थनपत्रासह नगराध्यक्ष किशोर गारोळे यांना पाठिंबा जाहीर करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. या घडामोडीनंतर मेहकर नगरपालिकेत महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटासाठी हा राजकीय धक्का मानला जात आहे.

# महापौर रितू तावडे यांच्या ताफ्याला अपघात

■ मुंबई

**मुंबईच्या** महापौर रितू तावडे यांच्या ताफ्याला सोमवारी सायन पुलावर किरकोळ अपघात झाला. ताफ्यासमोर अचानक आलेल्या एका दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात ही घटना घडली. सुदैवाने या अपघातात महापौर रितू तावडे तसेच ताफ्यातील कर्मचारी आणि सुरक्षारक्षक जखमी झाले नाहीत.

महापौर रितू तावडे या एका नियोजित कार्यक्रमासाठी ताफ्यासह जात होत्या. सायन पुलावरून प्रवास करत असताना अचानक एक दुचाकीस्वार ताफ्यासमोर आला. त्याला वाचवण्यासाठी ताफ्यात सर्वात पुढे असलेल्या एस्कॉर्ट वाहनाच्या चालकाने तातडीने ब्रेक लावला. एस्कॉर्ट वाहन अचानक थांबल्याने त्यामागील महापौरांची अधिकृत गाडी पुढील वाहनाला धडकली. त्यानंतर महापौरांच्या गाडीच्या मागे असलेल्या दुसऱ्या एस्कॉर्ट वाहनानेही समोरील वाहनाला धडक दिली.

त्यामुळे ताफ्यातील तीन वाहनांची साखळी धडक झाली.

या अपघातात महापौरांच्या वाहनासह ताफ्यातील सुरक्षा वाहनांचे किरकोळ नुकसान झाले.

काही काळ सायन पुलावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

पश्चिम रेल्वे

सुधारणा कार्य

सहाय्यक विद्युत अभियंता ईएमयू कारखाना, महालक्ष्मी आमंत्रित करीत आहेत निविदा सूचना क्र.: ईएल९०-एमएक्स-२०२६-२७-०२-एम. कामाचे नाव व त्याचे ठिकाण: ३-फेज ईएमयू कोचेसमध्ये सेंटर पिव्होट फिक्सिंगच्या व्यवस्थेमध्ये सुधारणा. अंदाजित अदमासे मूल्य: ₹ ६०,१७,६१२.४०. ईएमडी: ₹ १,२०,४००/-. ई-बोलीच्या ऑनलाईन सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक आणि वेळ: दि. ०६.०७.२०२६ रोजी, १४.३० वाजेपर्यंत आणि ई-निविदा उघडणे: दि. ०६.०७.२०२६ रोजी १४.३० वा. बोली अर्ज आणि शुद्धीपत्रक यांसारखे इतर तपशील वेबसाईट www.ireps.gov.in येथून प्राप्त करता येतील. 0254

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# कुंभमेळ्यापूर्वीच लाचखोरांचा मेळा

सरकारी कामांमध्ये चालणारी टक्केवारी हा गेल्या काही दिवसांतला पुन्हा जोरदार चर्चेत आलेला विषय आहे. कोल्हापूर येथे महाराष्ट्र राज्य ठेकेदार महासंघाचा मेळावा नुकताच पार पडला. त्यामध्ये शासकीय कामांच्या कंत्राटासाठी आमदारांना, अधिकाऱ्यांना तब्बल ५६ टक्के रक्कम वाटावी लागते. अशा प्रकारची जाहीर टीका केली गेली. त्याची वर्गवारी देताना आमदारांना दहा टक्के, अधिकारी कर्मचाऱ्यांना पंधरा टक्के रक्कम द्यावी लागते. याशिवाय पंधरा टक्के जीएसटी भरावी लागते. शिवाय पंधरा ते वीस टक्के कमी रकमेने निविदा भरावी लागत असल्याने ठेकादारांना केवळ आठ टक्केच फायदा होतो. यातली पंचवीस टक्के रक्कम ही आमदार आणि अधिकाऱ्यांना वाटली जात असेल आणि ती बाब ठेकेदार जाहीरपणे बोलत असतील. तर शासकीय कामातल्या भ्रष्टाचाराचा तो अगदी ठोस पुरावा म्हणता येईल. एकीकडे जाहीर मेळाव्यातून केली गेलेली ही जाहीर टीका तर दुसरीकडे लाचखोरीने राज्यात घातलेला धुमाकूळ तितकाच भयानक स्वरूपाचा म्हणावा लागतो. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या गेल्या सहा महिन्यातल्या नोंदींवरून राज्यात सहा महिन्यांमध्ये तब्बल १ कोटी ७८ लाख ९१ हजार ६६९ रुपयांची लाचखोरी पकडली गेली. म्हणजे न पकडलेल्या किंवा न सापडणाऱ्या लाचखोरीचा अंदाज घेतला तर ती निश्चितच दहा पट असू शकेल यात काही शंका राहत नाही. कारण हजारो कोटींची कामे सुरू असतात आणि त्याच्या मोबदल्यात अधिकाऱ्यांकडून पंधरा टक्के रक्कम मागितली जात असेल तर महिन्याकाठी ती निश्चितच चार-पाच कोटीच्या वर जात असेल. यामध्ये सर्वाधिक लाचखोरी ही महसूल विभागात २८ प्रकरणं लाचखोरीची सापडली. त्यात साडेएकोणीस लाख रुपयांची लाच घेतली गेली होती. त्यापाठोपाठ महावितरण कंपनीत लाचखोरीची प्रकरणं जरी बारा असली तरी ९ लाख ८० हजाराची लाच पकडली गेली. पोलीस विभागाने आपला क्रमांक कायम दोन नंबरवर ठेवला आहे. तिथेदेखील पंधरा प्रकरणांमध्ये पावणेनऊ लाखांची लाचखोरी झाली. शिक्षण आणि आरोग्यसारखे महत्त्वाचे विभागसुद्धा लाचखोरीने बरबटले आहेत. तिथल्या नऊ प्रकरणांमध्ये जवळपास साडेसहा लाखांची लाचप्रकरणं पकडली गेली. या सर्वातून लाचखोरांचा धुमाकूळ सुरूच असल्याचे स्पष्ट होते.

**वाढता वाढता वाढे लाचखोरी**

केवळ सहा महिन्यांची ही आकडेवारी आहे. वर्षभरामध्ये लाचखोरीचा हा आकडा कुठे जाऊन पोहचत असेल याचा सहज अंदाज येतो. सध्या नाशिकमध्ये कुंभमेळ्याची तुडुंब कामं सुरू आहेत. पुढच्या दोन-तीन महिन्यामध्ये तब्बल ३५ हजार कोटीची कामे पूर्ण करायची आहेत. यासाठी गेल्या तीन-चार महिन्यांपासूनच कामे मिळवणाऱ्यांचा आणि आपल्याच बगलबच्चांना कामे देण्याची स्पर्धा सुरू होती. तिथेदेखील अगदी उघडपणाने ३५ टक्क्यांपर्यंत पैसे वाटावे लागत असल्याचा आरोप झाला होता. आणि तो तितकाच खरा असल्याचे म्हणावे लागेल. कारण गेल्या सहा वर्षातल्या या लाचखोरीच्या सुळसुळाटामध्ये नाशिक विभाग प्रथम क्रमांकावर आहे. केवळ सहा महिन्यांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ७७ सापळे रचले. त्यात १२० जणांना लाच घेताना पकडले गेले. आणि लाचेची रक्कम ही ५२ लाख ९८ हजार ३९० रुपये होती. म्हणजे जवळपास ५३ लाख रुपये लाच उघड उघड मागितली गेली. नाशिक विभागात येणाऱ्या नेवासा इथल्या महावितरणच्या अभियंत्याने तर चक्का ऑनलाईन पाच हजार रुपये साध्या वीज जोडणीसाठी घेतले. तर घोटी पोलीस ठाण्यात एका पोलीस हवालदाराने ऑनलाईन पाच हजाराची लाच घेण्याचे धाडसही दाखवले. अजून तर कुंभमेळा पार पडायचा आहे. अनेक कंत्राटदारांची बिलं मंजूर व्हायची आहेत. ती लवकर मंजूर होण्याकरीता पुन्हा हा टक्केवारीचा गोरख धंदा जोरात सुरू होईल. स्वाभाविकपणे एकट्या नाशिक विभागातच अधिकारी स्तरावर पंचवीस ते पन्नास कोटीची लाचखोरीची खिरापत वाटली जाईल असा अंदाज आहे. राजकारण्यांच्या टक्केवारीचा हिशोब तर आणखीनच वेगळा होऊ शकतो. कारण राजकारण्यांच्याबाबतीत तर आपल्या दलालामार्फत वेगवेगळ्या पद्धतीने टक्केवारीचे हिशेब चुकते केले जातात. कारण पुढच्या कामांचेही हिशोब त्याच्याशी जोडलेले असतात.

**कायदेशीर कामे, तरीही लाच**

यातला आणखी एक धक्कादायक भाग असा आहे की, साधारणपणे नियमबाह्य किंवा बेकायदेशीर कामांसाठी लाच मागण्याचा प्रकार होतो. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली दिसत नाही. या सहा महिन्यांतल्या एकूण ३४८ प्रकरणांमध्ये ७६ प्रकारांत कायदेशीर कामांसाठीदेखील लाच मागितले गेल्याचे दिसून आलेले आहे. मग त्यात सरकारी कामाचे बिल पास करणे, सात बारा उतारा मिळवणे, नवीन वीज मीटरसाठी पैसे मागणे, एवढेच नाही तर अगदी ज्येष्ठ नागरीकांचे पेन्शन बिल मंजूर करण्यासाठी पैसे मागितले गेल्याचे आढळून आले आहे. राज्यात नाशिक पाठोपाठ पुण्यामध्ये ६९ प्रकरणांमध्ये २५ लाख ५९ हजार ७०० रुपयांची लाचखोरी पकडली गेली. त्याखालोखाल ठाण्यात ५२ प्रकरणांत ३१ लाख ५३ हजार ७०० रूपये, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४६ प्रकरणांमध्ये १३ लाख ३७ हजार ७०० रुपये, नागपूरमध्ये ३० प्रकरणांत १३ लाख ६३ हजार रुपये, नांदेडमध्ये २७ प्रकरणात ३ लाख ६४ हजार ९७९ रूपये, अमरावतीमध्ये ३१ प्रकरणांत ६ लाख ४ हजार रुपये, मुंबईत प्रकरणांची संख्या जरी १६ असली तरी लाचखोरीची रक्कम ही तब्बल ३२ लाख १० हजार २०० रुपये असल्याचे लाचलुचपत विभागाच्या नोंदीतून स्पष्ट होते. नाशिकमध्ये कुंभमेळ्यापूर्वीच लाचखोरांचा मेळावा धिंगाणा घालत असल्याचे या आकड्यांवरून स्पष्ट होते. हजारो कोटींची कामे म्हटल्यानंतर भ्रष्टाचाराच्या या गटारात लोळणाऱ्यांची संख्याही प्रचंड मोठी असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.


## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

लोकांच्या चर्चेत राहण्यापेक्षा लोकांच्या मनात राहणं शिका.
कारण चर्चा ही संपून जाते, पण मनातलं स्थान कधीच मिटत नाही.

## पंचांग

**बुधवार, १७ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल तृतीया**
**नक्षत्र : पुनर्वसु**



**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१६**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०८-१३ मिथुन**
**०८-२४ ते २४-०० कर्क**

**रंभा तृतीया, रंभाव्रत, राजमाता जिजाऊ स्मृतिदिन, मुस्लीम मोहरम मासारंभ, हिजरी सन १४४८ प्रारंभ**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### मँगो बटर चिकन



★ **साहित्य :-** मसाला- ३ टीस्पून गरम मसाला, २ टीस्पून हळद, ३ टीस्पून जिरे, २ टीस्पून धणेपावडर, ३ टीस्पून काश्मिरी मिरची पावडर, **मॅरिनेडः** चिकन ब्रेस्ट्स - १ किलो (मोठे तुकडे कापलेले) २ टीस्पून दही, २ टीस्पून लसूण पेस्ट, १ टीस्पून आले पेस्ट, ३ टीस्पून बटर चिकन मसाला, १ लिंबाचा रस, १ टीस्पून मीठ, १ मूठभर कोथिंबिर, चवीनुसार मीठ. **सॉससाठीः** ५ चमचे लोणीऐवजी तूप वापरू शकता, चिरलेला टोमॅटो - ८०० ग्रॅम, २ कांदे मध्यम आकाराचे - बारीक चिरून, लसूण २ चमचे बारीक चिरून घ्या. २ टीस्पून बटर चिकन मसाला, १ ताजा पिकलेला आंबा, १ कप हेवी क्रीम, मीठ चवीनुसार.

★ **कृती :-** मसाले, दही, लसूण, आले, धणे, लिंबाचा रस आणि मीठ यांच्या मिश्रणात चिकनचे तुकडे मॅरिनेट करा. ते रात्रभर फ्रीजमध्ये ठेवून द्या किंवा रूम टेंपरेचरवर १ तास ठेऊन द्या. जेव्हा बनवायचे आहे तेव्हा ते बाहेर काढा. नॉन-स्टिक फ्राईंग पॅनमध्ये तेल किंवा तूप मोठ्या आचेवर गरम करा. चिकनचे तुकडे नीट तपकिरी होईपर्यंत पॅन-फ्रायमध्ये सर्व बाजून भाजून घ्या. आता फ्राय चिकनला बाजूला ठेवा. त्याच पॅनमध्ये, मध्यम आचेवर उरलेले लोणी किंवा तूप वितळवा. कापलेले कांदे अर्धपारदर्शक होईपर्यंत एक चमचे मीठ घालून परतून घ्या. नंतर त्यात बारीक केलेला आले, लसूण, उरलेले मसाले आणि उरलेला मॅरीनेड मसाला घाला, सुमारे २ मिनिटे तेल सुटेपर्यंत शिजवा. आता नॉन-स्टिक पॅनमध्ये तेल किंवा तूप जास्त आचेवर गरम करा. चिकनचे तुकडे नीट तपकिरी होईपर्यंत फ्राय करा. फ्राय चिकन बाजूला ठेवा. त्याच पॅनमध्ये, मध्यम आच करा आणि उरलेले लोणी किंवा तूप वितळवा. कापलेले कांदे अर्ध पारदर्शक होईपर्यंत एक चमचे मीठ घालून परता घाला. नंतर, किसलेले आले, लसूण, उरलेले मसाले आणि बाकीचे कोणतेही मॅरीनेड घालून सुमारे २ मिनिटे सुवासिक होईपर्यंत शिजवा. आता पॅनमध्ये चिरलेला टोमॅटो घाला, गॅस कमी करून घ्या. त्यानंतर डबल क्रीम आणि आंबा घाला. ब्लेंडर वापरून चांगले मिक्स करून घ्या. शिजवलेले चिकन घाला आणि मिश्रण एक उकळी आणा. १० मिनिटे शिजू द्या, आवश्यकतेनुसार मीठ टाका.

## क्रीडा



# थरारक सामन्यात दोन वेळा पिछाडीनंतरही

## इराणने न्युझीलंडविरोधात २-२ बरोबरी साधली

**फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेतील गट 'जी' मधील थरारक सामन्यात इराणने दोनवेळा पिछाडीवरून शानदार पुनरागमन करत न्यूझीलंडला २-२ च्या बरोबरीत रोखले. लॉस एंजेलिसच्या सोफी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात एलिजा जस्टच्या दोन गोलांच्या जोरावर न्यूझीलंडने दोनदा आघाडी घेतली होती. मात्र रामिन रझाईयान आणि मोहम्मद मोहेब्बी यांच्या गोलमुळे इराणने हार टाळत एक गुण मिळवला. राजकीय तणाव आणि सरकारविरोधी निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर खेळल्या गेलेल्या या सामन्याने मैदानावरील चुरशीइतकीच मैदानाबाहेरील घडामोडींमुळेही चर्चा रंगली.**



■ लॉस एंजेलिस

**सामन्यापूर्वीच** राजकीय तणाव, निदर्शने आणि सुरक्षा व्यवस्थेमुळे हा सामना चर्चेत होता. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर लॉस एंजेलिसमध्ये मोठ्या प्रमाणात इराणी-अमेरिकन नागरिक उपस्थित होते. काही जण राष्ट्रीय संघाला पाठिंबा देत होते, तर अनेकांनी इराण सरकारविरोधात निदर्शने केली. सामन्याच्या सुरुवातीलाच न्यूझीलंडने आक्रमक खेळ दाखवत सातव्या मिनिटाला आघाडी घेतली. ख्रिस वूडच्या अचूक पासवर एलिजा जस्टने गोल करत न्यूझीलंडला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र इराणने हार मानली नाही. ३२ व्या मिनिटाला बचावपटू रामिन रझाईयानने जवळून चेंडू जाळ्यात ढकलत संघाला बरोबरी मिळवून दिली. या गोलनंतर स्टेडियममध्ये उपस्थित इराणी समर्थकांनी जल्लोष केला. दुसऱ्या सत्रात ५४व्या मिनिटाला एलिजा जस्टने सामन्यातील दुसरा गोल झळकावत न्यूझीलंडला पुन्हा आघाडी मिळवून दिली. ख्रिस वूडने निर्माण केलेल्या संधीचा त्याने अचूक फायदा घेतला. पण इराणने पुन्हा एकदा जिद्द दाखवली. ६४व्या मिनिटाला मोहम्मद मोहेब्बीने हेडरद्वारे गोल करत स्कोअर २-२ असा बरोबरीत आणला. त्यानंतर दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र कोणालाही निर्णायक गोल करता आला नाही. याच गटातील दुसरा सामना बेल्जियम आणि इजिप्त यांच्यात १-१ अशा बरोबरीत सुटल्याने गट 'जी' मधील चारही संघांच्या संधी कायम आहेत. इराणचा पुढील सामना बेल्जियमविरुद्ध होणार असून, न्यूझीलंडचा सामना इजिप्तशी होईल.

दरम्यान, सामन्यानंतर इराणी संघाच्या अडचणी आणखी वाढल्या. मुख्य प्रशिक्षक आमिर घालेनोई यांनी दावा केला की, संघाला सामन्यानंतर लगेच अमेरिका सोडून मेक्सिकोतील तिजुआना येथे परतण्याचे निर्देश देण्यात आले. इराणी संघाची योजना लॉस एंजेलिसमध्ये रात्रभर मुक्काम करून दुसऱ्या दिवशी परतण्याची होती. मात्र अचानक प्रवास करावा लागल्याने खेळाडूंना विश्रांती आणि रिकव्हरीसाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. तर इराणचा कर्णधार मेहदी तारेमी यानेही प्रवास व्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली. तिजुआनाहून लॉस एंजेलिसपर्यंतचा प्रवास सामान्यतः कमी वेळात होऊ शकतो.

**१८ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| ०१.३० मध्यरात्री | इंग्लंड विरुद्ध क्रोएशिया |
| ४.३० पहाटे | घाना विरुद्ध पनामा |
| ७.३० पहाटे | उझबेकिस्तान विरुद्ध कोलंबिया |
| ९.३० रात्री | झेक विरुद्ध दक्षिण आफ्रिका |

# नेशन्स कपमध्ये भारतीय महिला हॉकी संघ उपांत्य फेरीत! जपानवर २-१ मात

■ ऑकलंड

**ऑकलंड** येथे सुरू असलेल्या एफआयएच महिला नेशन्स कप स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने विजयी मालिका कायम राखत जपानचा २-१ असा पराभव करत उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले. कर्णधार सलीमा टेटे आणि लालरेम्सियामी यांच्या गोलच्या जोरावर भारताने सलग दुसरा विजय मिळवत सहा गुणांसह पूल 'अ' मधील अव्वल स्थान कायम राखले.

पहिल्या दोन क्वार्टरमध्ये दोन्ही संघांना गोल करता आला नाही. तिसऱ्या क्वार्टरमध्ये सलीमा टेटेच्या गोलमुळे



भारताने आघाडी घेतली. मात्र दोन मिनिटांतच आय हिरामित्सूने जपानला बरोबरी मिळवून दिली. अंतिम क्वार्टरमध्ये लालरेम्सियामीने ४९व्या मिनिटाला निर्णायक गोल करत भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारतीय बचावफळीने भक्कम कामगिरी करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

# जसपाल राणा यांच्या आई श्यामा यांचेही निधन

■ नवी दिल्ली

**भारतीय** नेमबाज जसपाल राणा यांच्या निधनानंतर अवघ्या चार दिवसांत त्यांच्या आई श्यामा देवी राणा (७८) यांचेही निधन झाले. श्यामा देवी राणा यांनी नवी दिल्लीतील लष्करी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. एकाच आठवड्यात माय-लेकाच्या जाण्याने राणा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ४९ वर्षीय जसपाल राणा यांचे १२ जून रोजी आकस्मिक निधन झाले होते. आपल्या एकुलत्या एका मुलाच्या जाण्याने श्यामा देवी यांना मानसिक धक्का बसला होता. तेव्हापासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत चालली होती. अखेर काल सकाळी दिल्लीतील लष्करी रुग्णालयात त्यांनी अंतिम श्वास घेतला. जसपाल राणा यांचे नातेवाईक दिनेश गौड यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

# टाईमच्या क्रीडापटूंच्या यादीत स्मृती मंधाना एकमेव भारतीय

■ नवी दिल्ली



**भारतीय** महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना हिने आणखी एक मोठा सन्मान आपल्या नावावर केला. प्रसिद्ध टाईम मासिकाने जाहीर केलेल्या २०२६ मधील क्रीडा क्षेत्रातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत स्मृतीचा समावेश करण्यात आला आहे. या यादीत स्थान मिळवणारी ती एकमेव भारतीय खेळाडू ठरली आहे.

जागतिक क्रीडा क्षेत्रावर प्रभाव टाकणारे खेळाडू, प्रशिक्षक, प्रशासक आणि इतर मान्यवरांचा या यादीत समावेश करण्यात आला आहे. स्मृती मंधाना हिच्यासोबत लेब्रॉन जेम्स, लिओनेल मेस्सी, ख्रिस्तियानो रोनाल्डो, कार्लोस अल्काराझ आणि जियानी इन्फँटिनो यांसारख्या जागतिक क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांची नावे आहेत.

टाईमने मंधानाच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे विशेष कौतुक केले आहे. देशांतर्गत एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारी पहिली भारतीय महिला, तिन्ही आंतरराष्ट्रीय प्रकारांमध्ये शतक करणारी पहिली भारतीय महिला आणि महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७ शतकांची बरोबरी करणारी खेळाडू म्हणून तिच्या कामगिरीचा उल्लेख करण्यात आला आहे. २९ वर्षीय मंधानाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटसोबतच फ्रँचायझी क्रिकेटमध्येही चमकदार कामगिरी केली आहे. तिच्या नेतृत्वाखालील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाने महिला प्रीमियर लीगमध्ये यश मिळवले तर भारताच्या मोठ्या स्पर्धांतील कामगिरीतही तिचे योगदान आहे.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**
**(सक्षम प्राधिकारी- १) यांचे कार्यालय**
एच.डी.आय.एल टॉवर ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१
संकेतस्थळ : www.sra.gov.in ईमेलः compauth1@sra.gov.in

क्र. सप्रा-१/टे-१-प्र/कावि-१३५५/२६ दिनांकः १५/०६/२०२६

**जाहिर नोटीस**

**श्री. नंदलाल रामअछेबर आग्रहारी** ...अर्जदार
**विरुध्द**
**श्री. रामलाल पुल्लन शर्मा** ... प्रतिवादी

**प्रति,**
श्री. रामलाल पुल्लन शर्मा
चांदणी एकता ''अ'' सह. गृह. संस्था,
वडाळा अॅन्टॉप हिल, मुंबई-३७.

सदर जाहिर नोटीसव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, अपिलार्थी श्री. नंदलाल रामअछेबर आग्रहारी यांनी गृहनिर्माण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/ प्र.क्र.१५९/ झोपनि २,०१ ऑक्टोबर, २०२४ नुसार दि. ०१/०१/२०११ पूर्वी निर्गमित परिशिष्ट-II मधील हस्तांतरीत झोपडीधारकानी हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी करावयाचा अर्ज (अभय योजना) मधील जोडपत्र - एक नुसार मा. सक्षम प्राधिकारी-१ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एच. डी. आय. एल. टॉवर, ३ रा मजला अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे चांदणी एकता ''अ'' सह. गृह. संस्थेचे मुळ परिशिष्ट-II अ. क्र. ४९ वर आपले नावाऐवजी अर्जदार यांचे नाव पात्रतेकामी जोडपत्र दाखल केले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयात उक्त प्रकरणी दि.२५/०६/२०२६, सुनावणी निश्चित करण्यात आली होती. सदर सुनावणीस आपण गैरहजर असल्याने मा. सक्षम प्राधिकारी - १ यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसव्दारे अवगत करणेच निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५/०६/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी असून सदर जाहिर नोटीसीव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित सुनावणी दि.२५/०६/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता मा.सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, यांचे दालनात उपस्थित/ हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सही/-
**(प्रफुल्ल पाटील)**
**सहा. महसूल अधिकारी**
**सक्षम प्राधिकारी-१**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे अशील **श्री. प्रदीप पूजारी** हे गाव कांजुरमार्ग, तालुका कुर्लाच्या **सर्व्हे क्र. २०२, सी.टी.एस. क्र. ५७८ (भाग ४) आणि सी.टी.एस. क्र. ५७८ (भाग ३)** धारण केलेल्या, बी.एम.सी. एस-प्रभाग जवळ, एल.बी.एस. मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई ४०००७८ येथे स्थित चोप्रा निवास ही सर्व तळमजला + १ ला मजला, मोजमाप अदमासे ३,१११ चौ.फू. ही सदर जमिनीवर बांधलेली तळमजला + १ ला वरील मजला समाविष्ट असणारी संरचना, व त्यासह सदर संरचनेशी संलग्न आणि उपलब्ध असणारे सर्व क्षेत्र, हक्क, लाभ, आणि सुविधा (यापश्चात सदर मालमत्ता असे उल्लेखित) विद्यमान मालक **डॉ. गणपत गुंडा खडतरे** आणि **डॉ. विजया गणपत खडतरे** यांच्याकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेत.
सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, करिता किंवा वर विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, वारसा, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, वहिवाट, ताबा या मार्गे किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींनी त्याबाबत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना येथील प्रसिद्धी दिनांकापासून **चौदा १४ दिवसांच्या** आत याखाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि अशा दाव्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय माझ्या अशिलाच्या नावे विक्री करारनामा बनविण्यात येईल, आणि तो, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता माफ केला, त्याग केला आणि/किंवा सोडून दिला असे समजण्यात येईल.

सही/-
**दिनांक १७ जून, २०२६** **दिवाकर द्विवेदी**
**ॲडव्होकेट, उच्च न्यायालय**
०२, जयश्री सदन, १ला मजला, जुना नागरदास रोड, अंधेरी (पू), मुंबई - ४०००६९.

**जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनता, सर्व खरेदीदार, इच्छुक खरेदीदार, वित्तीय संस्था, बँका, गुंतवणुकदार, ब्रोकर्स, एजन्ट्स, अधिकारी आणि कोणत्याही सर्व व्यक्तींना याद्वारे सूचना देण्यात येते कीः

**न्यू ड्रीमलॅण्ड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा, १९६० अंतर्गत नोंदणीकृत आणि सी.टी.एस. क्र. ४३६ व ४३७, सर्व्हे क्र. ६४, हिस्सा क्र. २ धारण केलेली, जय भवानी माता रोड, ऑफ सीझर रोड, आंबोली, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८ येथे वसलेली आणि स्थित असलेली संस्था (यापश्चात "संस्था" असे उल्लेखित)**, यांनी मे. कमांडींग बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स एलएलपी यांना संस्थेच्या मालमत्तेच्या प्रस्तावित पुनर्विकासाशी संबंधित वेळोवेळी अंमलात आणलेल्या विशिष्ट प्रस्ताव, हेतू पत्रे, प्राधिकृतता, मंजुऱ्या, मुखत्यार पत्रे आणि/किंवा इतर लिखिते यांच्या अनुषंगानेसंस्थेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता प्रस्तावित विकासक म्हणून मंजूर केले आहे. विकासक त्यांची जबाबदारी पार पाडण्यास अयशस्वी ठरले आहेत आणि त्यांनी संस्थेद्वारे पारित ठरावाच्या अनुषंगाने पुनर्विकास प्रक्रिया सुरू करण्याकरिता कोणतीही कृती केलेली नाही.

पुनर्विकास व्यवस्था आणि संबंधित परिस्थितींचे पुनरावलोकन करून, संस्थेने लागू कायद्यानुसार सदर विकासकाची नियुक्ती/अधिकार/अधिकृतता मागे घेतली, रद्द केली आणि समाप्त करण्याचे ठरविले आहे. सेवा समाप्तीचे पत्र/सूचना दिनांक ०७ जानेवारी, २०२६ च्या आधारे, संस्थेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या संबंधात सदर विकासकाच्या नावे यापूर्वी मंजूर केलेले सर्व हक्क, प्राधिकार, परवानग्या, प्रतिनिधित्वे, संमती, मंजुऱ्या, अधिकार, हेतू पत्रे, प्राधिकार पत्रे, डिजिटल स्वाक्षऱ्या, परवानग्या आणि/किंवा कशाही प्रकारचे कोणतेही इतर अधिकार, जर असल्यास, तात्काळ प्रभावाने रद्द, निरस्त, मागे घेण्यात आणि समाप्त करण्यात आले आहेत. संस्था याद्वारे घोषित करते की, सोसायटीची मालमत्ता आणि/किंवा तिचा पुनर्विकास यांबाबत संबंधित विकासकाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकीहक्क, अधिकार, पात्रता, हितसंबंध, परवाना, विकास-अधिकार, एजन्सी, संमती किंवा परवानगी नाही.

सर्वसाधारण जनता, बँका, वित्तीय संस्था, खरेदीदार, गुंतवणूकदार, ब्रोकर्स, एजंट्स आणि इतर कोणत्याही व्यक्तींना याद्वारे सूचित आणि सावध करण्यात येत आहे की, त्यांनी संस्थेची मालमत्ता आणि/किंवा प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पाच्या संदर्भात संबंधित विकासकाशी किंवा त्यांच्यामार्फत कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा करार करू नये. यामध्ये कोणताही करार, बुकिंग, वाटप, गुंतवणूक, कर्ज, बोजा, गहाणवट, अभिहस्तांकन, हस्तांतरण, धारणाधिकार, भार किंवा त्रयस्थ पक्षाचे अधिकार निर्माण करणे यांसारख्या बाबींचा समावेश आहे. संबंधित विकासकाने जारी केलेल्या कोणत्याही विधानावर, मंजुरीवर, संमतीवर, अधिकारावर, दस्तऐवजावर, पत्रव्यवहारावर, माहितीपत्रकावर, जाहिरातीवर किंवा आश्वासनावर विसंबून राहून किंवा त्यानुसार कृती करणाऱ्या व्यक्तीने ती कृती पूर्णपणे स्वतःच्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारून करावी; त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसान, हानी, वाद, दावा किंवा प्रतिकूल परिणामास संस्था आणि तिचे सदस्य कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. संस्था हे देखील स्पष्ट करते की, संबंधित विकासकाने निर्माण केलेला किंवा निर्माण केल्याचा दावा केलेला कोणताही व्यवहार, दावा किंवा अधिकार संस्थेवर किंवा तिच्या सदस्यांवर बंधनकारक राहणार नाही आणि तो संस्थेच्या हक्कांच्या व कायदेशीर उपायांच्या अधीन राहील. यासंदर्भात कोणा व्यक्तीचा काही दावा किंवा आक्षेप असेल, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकार यांना लेखी स्वरूपात कळवावे; अन्यथा, असा कोणताही दावा, जर असल्यास, सोडून दिला किंवा त्याग केला असे समजण्यात येईल. तमाम जनतेने याची कृपया नोंद घ्यावी.

**न्यू ड्रीमलॅण्ड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**
ठिकाणः मुंबई करिता आणि त्यांच्या वतीने
दिनांकः १७.०६.२०२६ सही/- अध्यक्ष/सचिव/खजिनदार

# दीर्घ पल्ल्याच्या स्वदेशी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

■ भुवनेश्वर

**भारताने** लांब पल्ल्याच्या अचूक हल्ल्याची आपली क्षमता आणखी मजबूत करत स्वदेशी लाँग रेंज लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. ही चाचणी ओडिशातील



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून करण्यात आली, ज्यात क्षेपणास्त्राने आपली सर्व उद्दिष्ट्ये यशस्वीरित्या पूर्ण केली. हे क्षेपणास्त्र पूर्णपणे स्वदेशी असून, डीआरडीओने विकसित केले आहे. या क्षेपणास्त्राची पल्ला क्षमता १००० ते १५०० किलोमीटरपर्यंत असण्याचा अंदाज असून, हे क्षेपणास्त्र अत्यंत अचूकतेने दूरवरील लक्ष्यांचा भेद करू शकते. हे क्रूझ क्षेपणास्त्र हवेत रडारच्या नजरेपासून वाचण्यासाठी जमिनीवरून अत्यंत कमी उंचीवरून उड्डाण करते. ते हवेतच लक्ष्य शोधून अचूक प्रहार करू शकते. हे क्षेपणास्त्र भारतीय नौदल, वायुदल आणि लष्कर अशा तिन्ही सेनादलांच्या ताफ्यात सामील केले जाणार आहे.

# अधिकारी तलवार ठेवणार नाहीत लष्कराच्या गणवेशात मोठे बदल

■ नवी दिल्ली

**भारतीय** लष्कराने जवानांच्या गणवेशातून गुलामगिरीच्या काळातील खुणा काढून टाकल्या आहेत. आर्मी युनिफॉर्म-२०२६ या १७४ पानांच्या नव्या मार्गदर्शक पुस्तकातून ब्रिटिशकालीन खुणा हटवून भारतीय ओळख अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नव्या नियमांनुसार, परेडदरम्यान रिव्ह्यूईंग अधिकाऱ्याने तलवार बाळगणे आता ऐच्छिक करण्यात आले आहे. यापुढे तलवार केवळ परेड कमांडर, कंटिंजेंट कमांडर आणि काही विशिष्ट अधिकाऱ्यांपुरती मर्यादित राहणार आहे. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, सेना दिन आणि गार्ड ऑफ ऑनर यांसारख्या महत्त्वाच्या समारंभातच तिचा वापर केला जाईल.

यासोबतच औपचारिक पोशाखात प्रथमच स्वदेशी 'बंदी जॅकेट'चा समावेश करण्यात आला आहे. बंद गळ्याचे हे जॅकेट शर्ट, पॅन्ट आणि बंद शूजसोबत परिधान करता येणार आहे. 'रॉयल'सारख्या वसाहतवादी शब्दांचा वापरही बंद करण्यात आला असून, काही जुन्या पोशाख घटकांना वगळण्यात आले आहे.

देश विदेश

# केरळमध्ये महिला, तृतीयपंथीयांना मोफत बस प्रवास योजना सुरू

■ तिरुवनंतपूरम

**केरळ** सरकारने महिला आणि तृतीयपंथीयांसाठी 'प्रियदर्शिनी योजना' अंतर्गत मोफत बस प्रवास योजना सुरू केली आहे. ही सुविधा केरळ राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व सामान्य बसेसमध्ये लागू करण्यात आली आहे.

तिरुवनंतपूरम येथील थंपानूर रोडवेज बस टर्मिनलवर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांनी या योजनेचा शुभारंभ केला आणि त्यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे कष्टकरी गरीब महिलांना मोठा फायदा होईल. सर्व वयोगटातील महिला आणि तृतीयपंथीयांना उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता हा लाभ मिळेल. प्रवासासाठी कोणतीही पूर्व-नोंदणी किंवा कागदपत्रे आवश्यक नाहीत. बसमध्ये कंडक्टरकडून झिरो-मूल्याचे (शून्य रुपये) तिकीट घ्यावे लागेल. पहिल्या टप्प्यात ही सुविधा केवळ



महामंडळाच्या सर्व ३,१२५ सामान्य बस सेवांसाठीच उपलब्ध आहे. या बसेसवर स्पष्टपणे 'प्रियदर्शिनी स्कीम' असे लिहिले आहे. यामुळे महिलांचा दरमहा ८०० ते १,००० रुपयांपर्यंतचा प्रवास खर्च वाचणार आहे.

# येमेनचा 'स्पायडर-मॅन' ज्वालामुखीत कोसळला

■ सना

**येमेनमधील** प्रसिद्ध साहसी युवक आणि कंटेंट क्रिएटर अंतर अल अबसी (३०) याचा धाडसी स्टंट करताना मृत्यू झाला. येमेनचा स्पायडर-मॅन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंतरचा ज्वालामुखीच्या खोल विवरात पडून मृत्यू झाल्याने देशात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अंतर अल अबसी येमेनच्या अल धाले प्रांतातील हरधत दमट या ज्वालामुखीच्या विवराजवळ चित्रीकरण करत होता. या ठिकाणी असलेल्या उंच आणि जवळपास सरळ खडकावर तो कोणत्याही सुरक्षासाधनांशिवाय चढण्याचा प्रयत्न करत होता. चढाईदरम्यान

## स्टंट जीवघेणा ठरला



अचानक त्याचा तोल गेला आणि त्याची पकड सुटल्याने तो थेट विवरात कोसळला. या दुर्घटनेचा व्हिडिओही मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये अंतर खडकाच्या भिंतीला धरून वर चढताना दिसतो. मात्र काही क्षणांतच त्याचा हात निसटतो आणि तो खोल विवरात पडतो. घटनेची माहिती मिळताच येमेनच्या नागरी संरक्षण विभागाने तातडीने बचाव मोहीम सुरू केली. विवर सुमारे १२० मीटर खोल असल्याने बचावकार्य अत्यंत कठीण ठरले. खडकाळ आणि धोकादायक परिसरामुळे पथकाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. सुमारे चार तासांच्या शोधमोहिमेनंतर पाणबुड्यांनी विवरातील पाण्याच्या पृष्ठभागाखालून सुमारे ३० मीटर खोलीवरून अंतरचा मृतदेह बाहेर काढला.

# नॉर्वेच्या राजकन्येचा मुलगा दोषी बलात्कार प्रकरणी ४ वर्षांची शिक्षा

■ ओस्लो

**नॉर्वेच्या** राजकन्या मेटे-मॅरिट यांचा मुलगा मारियस बोर्ग होईबीला ओस्लो जिल्हा न्यायालयाने बलात्काराच्या २ गुन्ह्यांत दोषी ठरवून ४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. त्यासोबत पीडित महिलांना आर्थिक भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने त्याला दिले. त्याला कोणताही शाही किताब नाही आणि ते राजघराण्याच्या अधिकृत कर्तव्यात सहभागी होत नाहीत तरीही या खटल्यामुळे नॉर्वेच्या राजघराण्याची मोठी नाचक्की झाली आहे.

त्याला एकूण ४० आरोपांपैकी ३४ गुन्ह्यांत दोषी ठरवण्यात आले. यात दोन बलात्कारांचे आरोप आणि मैत्रिणीवर घरगुती हिंसाचार



केल्याचा समावेश आहे. त्याच्यावर ४ महिलांच्या बलात्काराचे आरोप होते, त्यापैकी दोन आरोपांमधून त्याला सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले. सरकारी वकिलांनी ७ वर्षे ७ महिन्यांच्या शिक्षेची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे ४ वर्षांची शिक्षा सुनावली.

# दुर्मीळ खनिज शोधण्यासाठी जपानी पथक ग्रीनलँडला जाणार

■ टोकियो

**चिनी** पुरवठ्यावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी जपान सरकार उच्चस्तरीय पथक ग्रीनलँडला पाठवणार आहे. तेथे दुर्मीळ खनिजांचा शोध घेण्यासाठी हे पथक आता सज्ज झाले असून, इलेक्ट्रिक वाहने, सेमीकंडक्टर्स आणि संरक्षण उपकरणांसाठी लागणाऱ्या दुर्मीळ खनिजांचे साठे शोधणे आणि खाणकामाच्या शक्यता तपासणे या मोहिमेचा हा मुख्य उद्देश आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटऱ्या, पवनचक्क्या आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्ससाठी दुर्मीळ खनिजांची नितांत आवश्यकता असते. सध्या या खनिजांच्या जागतिक पुरवठ्यावर आणि शुद्धीकरणावर चीनचे एकहाती नियंत्रण आहे. ते पूर्णपणे कमी करण्यासाठी जपानकडून हे पाऊल उचलले जात आहे. वाढत्या तापमानामुळे ग्रीनलँडमधील बर्फ वितळत असल्यामुळे येथील खनिज साठ्यांचे उत्खनन करणे आता शक्य आणि सोपे झालेले आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेनुसार येथे १५ लाख मेट्रिक टन दुर्मीळ खनिजांचे साठे आहेत.

# भारत नेट व ड्रोन सुधारित धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ मुंबई

**इलेक्ट्रॉनिक्स,** माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या माध्यमातून राज्य सरकारने डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देणारे दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्यात अमेंडेड भारत नेट कार्यक्रम अधिक प्रभावीपणे आणि वेगाने राबवण्यासाठी सुधारित अंमलबजावणी पद्धतीला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण-२०२६ जाहीर करून ड्रोन आणि रोबोटिक्स क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा देण्यात आली आहे.

भारत नेट कार्यक्रमाची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी 'महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत उच्च गती इंटरनेट सुविधा पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. डिजिटल सेवा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण, आरोग्य सेवा आणि ग्रामीण भागातील इंटरनेट कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी या प्रकल्पाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# भाजपाच्या विरोधानंतरही पुनावळेतील जागा भाडेतत्त्वावर देण्यास मंजुरी

**पिंपरी** - पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यातील पुनावळे येथील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित ९१ गुंठे जागा ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर खासगी संस्थेला देण्याच्या प्रस्तावावरून सर्वसाधारण सभेत जोरदार वाद झाला. स्थानिक भाजपाच्या चारही नगरसेवकांनी या निर्णयाला विरोध केला. पण विरोधानंतरही महापौर रवी लांडगे यांनी उपसूचनेसह विषयाला मंजुरी दिली. या जागेवर उभारल्या जाणाऱ्या शाळेत ४० टक्के जागांवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, अशी उपसूचना नगरसेवक राहुल कलाटे यांनी मांडली. यावेळी नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी खासगी संस्थेला जागा देण्यास तीव्र विरोध दर्शविला.

# भोंदू खरातच्या पत्नीचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**छत्रपती संभाजीनगर** - शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारी प्रकरणात भोंदूबाबा अशोक खरात यांची पत्नी कल्पना खरात हिचा अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे. त्यामुळे आता या प्रकरणात त्यांची पोलीस कोठडीत चौकशी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तक्रारीनुसार, त्यांनी आरोपींकडून २ टक्के मासिक व्याजदराने ३ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाच्या हमीपोटी फिर्यादीच्या मालकीची शेती कल्पना खरात यांच्या नावावर खरेदीखत करून घेण्यात आली होती.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सुचना

ठाणे महापालिका क्षेत्रात प्राण्यांच्या एल.पी.जी. शवदाहिन्या, वेट स्क्रबरची निगा, देखभाल, दुरुस्ती व परिचलन कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करण्याकरीता व मनुष्यबळ पुरवण्याकरीता ऑन-लाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि. १७/०६/२०२६ ते दि.०१/०७/२०२६ पर्यत सायंकाळी ०४.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. दि.०१/०७/२०२६ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि.०२/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. सर्व निविदा किंवा काही निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार ठाणे महानगरपालिका स्वत: कडे राखून ठेवत आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२०९/२०२६-२७ सही/-
दि:१६.०६.२०२६ वैद्यकीय आरोग्य अधिकारी
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**



## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की (१) **नीना अँजेला डी सूझा आणि (२) जोसेफ विवेक ट्रिडाडे** यांनी खालील अनुसूचीमध्ये अधिक लिखित तपशीलवार वर्णन केलेली मालमत्ता तसेच त्यावरील त्यांचे अविभाजित हक्क, शिर्षक व हितसंबंध आमच्या अशिलांना विकण्याबाबत वाटाघाटी केलेल्या आहेत, तसेच आमच्या अशिलांनी आम्हास सदर मालमत्तेसंबंधीचे हक्क, शिर्षक व हितसंबंध यांची चौकशी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

कोणा व्यक्तिस खालील अनुसूचीमध्ये लिखीत वर्णन केलेल्या मालमत्तेबाबत किंवा विरोधात तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल, अधिभार, गहाण, वारसा, हिस्सा, भेट, मृत्युपत्राद्वारे देणगी, धारणाधिकार, शुल्क, देखभाल, उपभोगाधिकार, न्यास, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वहिवाट, पोट वहिवाट, लीव्ह अँड लायसन्स, करार, अटी-शर्ती, ताबा किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा आणि/किंवा कोणताही वाद, दावा, खटला, न्यायनिर्णय, आदेश, प्रतिबंधात्मक अटी, मनाई आदेश, जप्ती, संपादन किंवा अधिग्रहण अथवा इतर कोणताही दावा याद्वारे कोणताही हक्क, शिर्षक, दावा, मागणी किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंबंधीची लेखी माहिती व त्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदोपत्री पुरावे खाली सही करणाऱ्यास या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत सादर करावेत, अन्यथा, अशा व्यक्तीचा दावा, जर काही असेल, तर तो माफ केलेला, त्यागलेला, सोडून दिलेला अथवा अस्तित्वात नसलेला मानला जाईल आणि त्याचा कोणताही पुढील संदर्भ न घेता सदर खरेदी व हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**येथे वर संदर्भित अनुसूची**

सर्व ती जमीनीचा भाग व खंड जी **कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. १/११७७ अशी असून सध्या अंतिम प्लॉट क्र. ७३५, मोजमाप क्षेत्रफळ ५७४.९८ चौ.मी.**, माहीम विभागाच्या टी.पी.एस. ३, जी/उत्तर विभाग, मुंबई महानगरपालिका हद्दीत स्थित आणि २री लेडी जमशेदजी क्रॉस रोड, बलरामजी लेन, माहीम (पश्चिम), मुंबई-४०००१६ येथे स्थित असून, मुंबई जिल्हा व उपजिल्ह्याच्या हद्दीत येते, तसेच त्यावरील उभ्या बांधकामांसह (अ) **कासा बियांका** म्हणून ज्ञात **निवासी घर**, जे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता खाते क्र. जीएन१५०१७३००४००००, महानगरपालिका विभाग क्र. ५१२०(१), रस्ता क्र.७ अंतर्गत मूल्यांकन केलेले, (ब) **आरसीसी गॅरेजेस**, जे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता खाते क्र. जीएन१५०१७३००३००००, महानगरपालिका विभाग क्र. ५१२०(३), रस्ता क्र.७बी अंतर्गत मूल्यांकन केलेले (क) गॅरेज म्हणून वापरली जाणारी **सीआय शेड**, जी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता खाते क्र. जीएन१५०१७५००७००००, महानगरपालिका विभाग क्र. ५१२०(२), रस्ता क्र. ७ए अंतर्गत मूल्यांकन केलेली.

आज दिनांकित १६ जून, २०२६ रोजी
पांड्या ॲण्ड पूनावाला करिता
सही/-
(यतीश पांड्या) भागीदार
वकील आणि सॉलिसिटर
१०२-१०४, भाग्योदय, १ला मजला,
७९, नगिनदास मास्टर रोड,
फोर्ट, मुंबई - ४०००२३.



## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender Notice (RFx No. 7000040317) (3rd Call)**

MSETCL invites digitally signed online bids for following tender through SRM E-tender process of MSETCL in two bid system from registered contractors, agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Tender No. & Description of Work | Due date & Time (Hrs) for submission & opening of Tender |
|---|---|---|
| 1. | Tender No. CELDK/SCADA/2026/ITOTLAB/4 | |
| | **Scope of Work:** Supply, Installation, Configuration, Testing and Commissioning of High-End servers for IT-OT Test Lab at MSLDC, Airoli & ALDC, Ambazari with Comprehensive Onsite warranty for the period of 5 (Five) Years. | Download of Tender Documents Date: From 17.06.2026 to 26.06.2026 Hrs 23:59 |

| | Estimated Cost (Rs) | EMD (Rs) | Tender Fee (Rs)+GST@ 18% Extra | Closing Date (Submission) | Tender (Technical) Opening dt. | Commercial Opening date |
|---|---|---|---|---|---|---|
| | Rs. 70,59,830/- | Rs. 70,598/- | 590/- (500 + 90 18% GST) | 26.06.2026 Up to 23:59 Hrs | 29.06.2026 11.00 AM (If possible) | 02.07.2026 11.00 AM (If possible) |

**Contact Person:** Executive Engineer (SCADA)/ Dy. Executive Engineer (SCADA)/ Assistant Engineer (SCADA)

Maharashtra State Load Dispatch Centre, Thane-Belapur Road. At & Post Airoli Navi Mumbai - 400708. Tel. no. 9769213859/8879756261/8087070878

For further details visit our website **http://mahatransco.in/** or **http://srmetender.mahatransco.in**

**Note: -** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal **http://srmetender.mahatransco.in.**

Sd/-
Superintending Engineer (SCADA/Admin)
(MSLDC) MSETCL, Airoli.



## जाहीर सूचना

याद्वारे **श्री. दीपक प्रमुखलाल देसाई** यांच्या वतीने सूचना देण्यात येते की, **श्री. किरीटचंद्र प्रमुखलाल देसाई आणि श्री. दीपक प्रमुखलाल देसाई** हे **फ्लॅट क्र. ३२, मोजमाप सुमारे १०३९ चौ. फूट क्षेत्रफळ, ५ व्या मजल्यावर, शंकर सागर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या सोसायटीतील 'शंकर सागर' म्हणून ज्ञात इमारतीत** याचे संपूर्ण कायदेशीर मालक आहेत, जे सोफिया कॉलेज रोड, भुलाभाई देसाई रोडजवळ, मुंबई - ४०००२६ येथे स्थित प्लॉट क्र. सी, सी.एस. क्र. १/६९८ वर असलेल्या जमिनीच्या सर्व भाग व खंडावर बांधकामित. **(यापुढे 'सदर मालमत्ता' म्हणून संदर्भित)**

**श्री. प्रमुखलाल रतनलाल देसाई** यांनी **मे. परबत केसरा पटेल आणि मे. कैलाश कन्स्ट्रक्शन कं.** यांच्याकडून दिनांक २०.०९.१९६० रोजीच्या विक्री करारनाम्याद्वारे सदर मालमत्ता संपादित केली होती.

**श्री. प्रमुखलाल रतनलाल देसाई** यांचे दिनांक ०५.०८.२००३ रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले आणि त्यांच्या पत्नी म्हणजे नामे **चंद्रकांता प्रमुखलाल देसाई** यांचेही दिनांक ०२.०२.२०१५ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे एकमेव कायदेशीर वारस नामे **१) श्री.दीपक प्रमुखलाल देसाई (मुलगा) आणि २) श्री.किरीटचंद्र प्रमुखलाल देसाई (मुलगा)** हे आहेत.

**श्री. किरीटचंद्र प्रमुखलाल देसाई** यांची सदर मालमत्ता **श्री. दीपक प्रमुखलाल देसाई** यांच्या नावे त्याग करण्याची इच्छा आहे.

सर्व व्यक्तीस, ज्यांना विषय मालमत्तेमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, देवाणघेवाण, भेटवस्तू, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, न्यास, वारसा, मृत्युपत्र, सुविधा, ताबा, लागवड, व्यवसाय, देखभाल, सामंजस्य करार, विकास हक्क, विक्रीचा करार किंवा अन्यथा याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही अधिकार, शीर्षक, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी खाली स्वाक्षरी केलेल्यांना, त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह पी.ओ.क्र. **व्ही. पत्के ॲण्ड कं. ॲडव्होकेट्स**, युनिट क्र. ६०९, ६वा मजला, ओमेगा आयटी पार्क, ईएसआयसी हॉस्पिटल जवळ, रोड क्र. १६, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या आत** लेखी कळविणे आवश्यक आहे, अन्यथा असे मानले जाईल की अशा सर्व व्यक्तींनी विषय मालमत्तेतील त्यांचे सर्व दावे, अधिकार, हितसंबंध आणि कोणत्याही स्वरूपाचे मालकी हक्क सोडून दिले आहेत आणि विषय मालमत्तेमध्ये त्यांचा कोणताही दावा, अधिकार, शिर्षक किंवा हितसंबंध उरलेला नाही.

आज दिनांकित १७ जून २०२६ रोजी
**व्ही. पत्के ॲण्ड कं. ॲडव्होकेट्स**
युनिट क्र. ६०९, ६वा मजला, ओमेगा आयटी पार्क, ईएसआयसी हॉस्पिटल जवळ, रोड क्र. १६, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. :- का. अ. (पूर्व) / मुं.झो.सु.मंडळ/ ई-निविदा/१७/२६-२७**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण **२३** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ **http://mahatenders.gov.in** वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १७.०६.२०२६ सकाळी १०.०५ पासून दिनांक २४.०६.२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/ बदल असल्यास फक्त **http://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/459
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial



## बृहन्मुंबई महानगरपालिका
### वृक्ष प्राधिकरण
**- जाहीर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८(३)(क) मधील तरतूदी नुसार **एकूण ०२** प्रस्ताव, मा. महानगरपालिका आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण (बीएमसी) / वृक्ष प्राधिकरण (बीएमसी)/ महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण यांच्या मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत. उपरोक्त प्रस्तावांमधील बाधित झाडे कापणे/ पुनर्रोपित करणेबाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | १ | २ |
|---|---|---|
| विभाग | एम/पू | एम/पू |
| जागेचा पत्ता | न.भु.क्र. १-भाग, मंडाळा गाव, अनुशक्तीनगर, मुंबई | बी. ए. आर. सी. ट्रोम्बे, मुंबई |
| कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित वृक्ष व जागेवरील एकूण वृक्ष | कापण्याकरीता प्रस्तावित : ३५ (वृक्ष क्र.१६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २९, ३१, ३२, ३३, ४०, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ५०, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४) पुनर्रोपणाकरीता प्रस्तावित : १८ (वृक्ष क्र. ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, २८, ३०, ४१, ४७, ४८, ४९, ५१, ५२) एकूण : ६४ | कापण्याकरीता प्रस्तावित : १२ (वृक्ष क्र. १० ते १४,२२,३६, ३७, ३८, ४९, ५० आणि ५३ ) पुनर्रोपणाकरीता प्रस्तावित : ५९ (वृक्ष क्र.१, ३ ते ९, १५ ते २१, २३ ते ३५, ३९ ते ४८, ५१, ५२. ५४, ६०, ६२ ते ६८, ७०, ७४, ७५, ७६, ७९ आणि ८१ ते ८५ ) एकूण : ८६ |
| कारण | प्रस्तावित मल्टीलेवल वाहनतळाच्या कामात बाधित | प्रस्तावित ए आणि बी-उत्तर बाजु येथील बांधकामात बाधित |
| अर्जदाराचे नाव | आर्किटेक्ट इनचार्ज (लायजनिंग ) परमाणु उर्जा विभाग | प्रमुख - वास्तुकला व स्थापत्य अभियंता विभाग- बीएआरसी |

सदर माहिती महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in** - बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी-- विभाग आणि खाते-- खातेनिहाय माहिती पुस्तिका -- उद्याने व वृक्ष प्राधिकरण -- कागदपत्रे -- २४ -- जाहीर सुचना --७ दिवस या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहित नमुन्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच, आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमुन्यात (Prescribed Format) **dysg.ta@mcgm.gov.in** या ई-मेलवरही नोंदवू शकतात.

विहीत मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सूचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई- मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहु शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि. २५/०६/२०२६ रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.०० वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधीक्षक वृक्ष अधिकारी,**
उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,
२रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,
संत सावता माळी मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - ४०००२७.
**दुरध्वनी क्र.** २३७४२१६२
**Email id -** dysg.ta@mcgm.gov.in

सही/-
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**

पीआरओ/५८९/जाहि./२०२६-२७

**शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.**



## पुणे महानगरपालिका, पुणे
पुणे महानगरपालिका

निविदा जाहिरात - नवीन कामे

**विक्री कालावधी दिनांक:-** १७/०६/२०२६ ते ०१/०७/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
**स्वीकृती दिनांक:-** १७/०६/२०२६ ते ०१/०७/२०२६ दुपारी २:३० पर्यंत **तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :** ०२/०७/२०२६ दु. ०३:३० वा.


| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पुर्वगणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ VEHICLE/ 2026/50 | मोटार वाहन विभाग | पुणे महानगरपालिका अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाने कामकाजाकरिता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्त्वावर घेणे. | ६,०७९ | १,९०,००,००० | १,९०,००० | १२ महिने/ टेंडर रक्कम संपेपर्यंत | श्री. नितीन शिंदे ९६८९९३१७०३ श्री.राजेंद्र तिडके ९६८९९८६४७६ |

अ) पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/ मनपा मान्यता प्राप्त/ शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्व पात्रता अटी टेंडर सेट नमूद केलेल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पध्दतीने मागविण्यात येत आहेत.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/ ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./ आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.

सही/-
अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/२२३ दि.१६/६/२०२६

# 'काला हिरन' मधून सोनूची माघार



**सलमान** खान यांच्या काळवीट प्रकरणावर आधारित 'काला हिरन: बॅटल ऑफ लेगसी' या आगामी चित्रपटाशी संबंधित वाद आता अधिक गडद झाला आहे. या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता सोनू मिश्रा याने या प्रकल्पातून माघार घेतली असून चित्रपट सोडण्यामागची कारणे जाहीर केली आहेत.

चित्रपट सोडण्याबाबत बोलताना अभिनेता सोनूने सांगितले की, या चित्रपटात त्याला सुपरस्टार सलमान खान याची भूमिका साकारण्याची संधी मिळाल्याने तो सुरुवातीला अतिशय उत्सुक होता आणि त्याने दोन दिवस चित्रीकरणही केले होते. मात्र, जेव्हा त्याला कळाले की या चित्रपटाची मूळ संकल्पना आणि हेतू नकारात्मक आहे, तेव्हा त्याने तातडीने यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. सोनू मिश्राच्या मते निर्मात्यांनी त्याच्याशी कोणताही अधिकृत करार केला नव्हता आणि संपूर्ण संहितादेखील दिली नव्हती. त्याने जेव्हा कराराची आणि संहितेची मागणी केली, तेव्हा निर्मात्यांनी त्याला काही अटी दाखवल्या. त्यामध्ये अभिनेत्याने प्रसारमाध्यमांसमोर सलमान खान याच्याबद्दल नकारात्मक विधाने करावीत, अशी अट असल्याचे उघड झाले. हे आपल्या नैतिकतेच्या विरोधात असल्याने आपण चित्रपट नाकारल्याचे त्याने स्पष्ट केले.

# परिणीतीचे नवे भक्तीगीत



**अभिनेत्री** आणि गायिका परिणीती चोप्रा हिने तिचे नवीन भक्तिगीत 'नमामी शमीशाम' प्रदर्शित केले असून हे गाणे तिने तिच्या गरोदरपणाच्या काळात ध्वनिमुद्रित केले होते, असा खुलासा तिने केला आहे. हे गाणे आपल्या आयुष्यातील एका अत्यंत सुंदर पर्वाच्या आठवणी जागृत करते, अशा भावना तिने व्यक्त केल्या आहेत.

याबाबत परिणिताने लिहिले की, काही प्रार्थना अशा असतात ज्या कायमच्या गोड आठवणी बनून मनात घर करतात आणि 'नमामी शमीशाम' हे गाणे त्यापैकीच एक आहे. हे गाणे तिने तिचा मुलगा नीर पोटात असताना गरोदरपणाच्या काळात ध्वनिमुद्रित केले होते. हा असा काळ होता ज्याने मला अधिक आस्तिक बनवले, तसेच आत्मपरीक्षण आणि कृतज्ञतेची भावना मनात निर्माण केली. आताही जेव्हा जेव्हा मी हे गाणे ऐकते, तेव्हा पुन्हा एकदा आयुष्यातील त्या सुंदर आणि भावनिक टप्प्यात हरवून जाते, असे ती सांगते. याआधीही परिणीतीने 'मेरी प्यारी बिंदू' चित्रपटातील 'माना के हम यार नही', 'केसरी' चित्रपटातील 'तेरी मिट्टी' आणि 'अमर सिंग चमकीला' चित्रपटातील 'पहिले ललकारे नाल'

या गाण्यांना आपला आवाज दिला आहे. हे नवीन भक्तिगीत सध्या तिच्या चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे.

# शर्वरीची गाडी सुस्साट



**अलीकडील** काळातील तरुण पिढीच्या मानसिकतेवर आधारित उत्कृष्ट चित्रपट देणारे दिग्दर्शक लव रंजन सध्या आपल्या नव्या चित्रपटाच्या संहितेवर काम करत आहेत. या चित्रपटात कार्तिक आर्यन मुख्य भूमिकेत असून त्याच्या जोडीला शर्वरी वाघला मुख्य अभिनेत्री म्हणून घेण्याची लव रंजन यांची इच्छा आहे. शर्वरीनेही या चित्रपटाबाबत प्रचंड उत्सुकता दर्शवली असून ती लव रंजन यांच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे. सध्या चित्रपटाची संहिता लिहिण्याचे काम अंतिम टप्प्यात असून या वर्षाच्या शेवटी म्हणजेच डिसेंबरमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करण्याचा निर्मात्यांचा मानस आहे. येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये लव रंजन हे सर्वप्रथम कार्तिक आर्यनला आणि त्यानंतर शर्वरीला संपूर्ण कथेचे वाचन करून दाखवणार आहेत. या दोन्ही कलाकारांना कथेचे वाचन दाखवल्यानंतरच पुढील अधिकृत कराराची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

अभिनेत्री शर्वरी सध्या चित्रपटसृष्टीत चांगलीच फॉर्मात आहे. इम्तियाज अली दिग्दर्शित 'मै वापस आऊंगा' या चित्रपटातील तिच्या कामाचे विशेष कौतुक झाले असून लवकरच ती यशराज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्स अंतर्गत बनणाऱ्या 'अल्फा' या चित्रपटात ॲक्शन अवतारात दिसणार आहे. यासोबतच सूरज बडजात्या दिग्दर्शित 'ये प्रेम मोल लिया' या चित्रपटातही ती मुख्य भूमिकेत असून हा चित्रपट या वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होणार आहे.

# विक्रांतची मोठी खंत



**आगामी** सायबर गुन्हेगारीवर आधारित 'प्रितम अँड पेड्रो' या वेब मालिकेच्या ट्रेलर लॉन्च सोहळ्यात अभिनेता विक्रांत मॅसीने त्याच्या कारकिर्दीतील एक मोठी खंत व्यक्त केली आहे. चित्रपटसृष्टीत सतत 'नेक्स्ट डोअर बॉय' म्हणजेच शेजारी राहणाऱ्या साध्या आणि सरळ मुलाच्या भूमिका साकारून आपल्याला प्रचंड कंटाळा आला होता, असा प्रांजळ खुलासा त्याने या वेळी केला. ट्रेलर लॉन्च दरम्यान आपल्या भावना व्यक्त करताना विक्रांत म्हणाला की, एकाच प्रकारच्या चौकटीत अडकून पडल्यामुळे एका टप्प्यावर त्याला कारकिर्दीत प्रचंड नैराश्य आले होते. प्रत्येक वेळी त्याच्याकडे त्याच साध्या आणि नेहमीच्या धाटणीच्या भूमिका येत होत्या. अशा वेळी काहीतरी वेगळे करण्याची त्याची तीव्र इच्छा होती आणि नेमकी हीच कोंडी लव रंजन यांच्या 'प्रितम अँड पेड्रो' या मालिकेने फोडली आहे. या मालिकेत विक्रांतने एका मुख्य खलनायकाची म्हणजेच एका अट्टल सायबर गुन्हेगाराची आव्हानात्मक भूमिका साकारली आहे. या नव्या नकारात्मक भूमिकेमुळे आपल्याला आपल्या अभिनयाचे वेगळे पैलू दाखवण्याची संधी मिळाली, असे त्याने आवर्जून सांगितले.

# दिशाची अतिरिक्त कमाई



**अभिनेत्री** दिशा पटानी हिने मुंबईतील खार वेस्ट या उच्चभ्रू भागात असलेला तिचा अलिशान फ्लॅट भाड्याने दिला असून त्यातून तिला पुढील दोन वर्षांत तब्बल ७१ लाख रुपयांचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. हा अलिशान फ्लॅट खार वेस्ट येथील रुस्तमजी पॅरामाउंट या अत्यंत महागड्या आणि प्रीमियम निवासी प्रकल्पात आहे. या फ्लॅटचा चटई क्षेत्रफळ आकार १००० चौरस फुटांपेक्षा जास्त आहे. हा फ्लॅट कमलाबेन मंगळभाई गुजर यांना भाड्याने देण्यात आला असून यासंबंधीचा दोन वर्षांचा लीव्ह अँड लायसन्स करार अधिकृतपणे १ जून २०२६ रोजी नोंदणीकृत करण्यात आला आहे. या कराराच्या अटींनुसार सुरुवातीचे मासिक भाडे २ लाख ८५ हजार रुपये निश्चित करण्यात आले आहे. भाडेकरूने सुरक्षा ठेव म्हणून तीन महिन्यांच्या भाड्याइतकी म्हणजेच ८ लाख ५५ हजार रुपयांची रक्कम जमा केली आहे. करारामध्ये दरवर्षी भाड्यात पाच टक्के वाढ करण्याची अट समाविष्ट करण्यात आली आहे. चित्रपटसृष्टीतील कामाव्यतिरिक्त दिशा पटानीने रिअल इस्टेट क्षेत्रात केलेली ही मोठी गुंतवणूक सध्या चांगलीच चर्चेत आली आहे.

# 'नाम'मध्ये नव्या भूमिकेत वीर पहाडिया



**अभिनेता** वीर पहाडिया याच्या आगामी 'नाम - टू लाईव्ह इज वॉर' या चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून ज्येष्ठ चित्रपट निर्माते महेश भट्ट या चित्रपटाचे प्रणेते म्हणून जोडले गेले आहेत. हा एक डार्क ॲक्शन थ्रिलर चित्रपट असून यामध्ये वीर पहाडिया एका नव्या आणि दमदार भूमिकेत दिसणार आहे.

या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अभिनेता वरुण शर्मा या चित्रपटात मुख्य खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. आतापर्यंत आपल्या उत्तम कॉमेडी आणि हलक्याफुलक्या भूमिकांसाठी ओळखला जाणारा वरुण शर्मा त्याच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच नकारात्मक भूमिका साकारणार आहे. वरुणचा हा नवा अवतार आणि त्याचा वीर पहाडियासोबतचा सामना हा या चित्रपटाचा मुख्य केंद्रबिंदू असणार आहे. हा चित्रपट उत्कृष्ट ॲक्शन आणि भावनिक थराराचे उत्तम मिश्रण असेल, असा अंदाज वर्तवला जात आहे. 'नाम' हा वीर पहाडियाच्या कारकिर्दीतील तिसरा चित्रपट ठरणार आहे.

# ठाणे जिल्हा बँक निवडणूक सहकार पॅनेलच जिंकणार

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांचा विश्वास

■ ठाणे



**पालघर** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत कुठलेही राजकारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत सहकार पॅनलच १०० टक्के जिंकून सत्तेवर येईल, असा ठाम विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. दरम्यान, उद्या बुधवार १७ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस आहे.

दि ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. २१ संचालक पदांपैकी १० संचालकांची बिनविरोध निवड झाली आहे. अशातच जिल्हा मध्यवर्ती बँकेवरील वर्चस्वासाठी भाजप शिवसेना महायुतीच्या परिवर्तन पॅनलची स्थापना ही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यासह सर्व वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानेच झाल्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री व परिवर्तन पॅनलचे प्रमुख कपिल पाटील यांनी स्पष्ट केले. काल सोमवारी सर्वपक्षीय 'सहकार पॅनल'ची घोषणा शिंदेसेनेचे खासदार नरेश म्हस्के व भाजपा आमदार किसान कथोरे यांनी केली. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार सुरेश म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, बविआचे क्षितीज ठाकूर यांसह विविध पक्षाचे नेते उपस्थित होते. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेत एकोप्याचे वातावरण पाहायला मिळत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

# मुंबईतील सीएसएमटी मेट्रो स्थानकावर वारणा मिल्क सेंटर

■ मुंबई

**मुंबईतील** भूमिगत छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) मेट्रो स्थानकावर आज वारणा मिल्क सेंटरचे भव्य उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, हे सेंटर कोल्हापूरमधील शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. तर हे अंडरग्राऊंड मेट्रो स्टेशन देशातील इंजिनिअरिंगचा एक उत्तम नमुना आहे.

या दूध केंद्रामुळे वारणाचे वेगवेगळ्या चवीचे बाटलीबंद दूध, श्रीखंड, बासुंदी आणि खवा, ताजे दही, ताक, लस्सी, पनीर, लोणी आणि चीज, गुलाबजाम, काजू कतली आणि म्हैसूर पाक, वारणाचे प्रीमियम बिस्किटे आणि पाणी मेट्रो स्थानकावर उपलब्ध होणार आहे.

# येस बँक घोटाळा प्रकरणी ईडीचे दिल्ली-मुंबईत १७ ठिकाणी छापे



■ नवी दिल्ली

**येस** बँक घोटाळा प्रकरणी मनी लॉण्ड्रिंगशी संबंधित एका प्रकरणात ईडीने मोठी कारवाई करत दिल्ली, मुंबई आणि खंडाळा येथील १७ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. ही कारवाई येस बँकेच्या कर्ज हस्तांतरण प्रकरणातील मनी लॉण्ड्रिंगशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले आहे. ईडीने सिक्युरिटी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड, सिक्युरिटी रिॲल्टी लिमिटेड, ख्याती रिअल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कार्यालयांसह संबंधित प्रवर्तक, संचालक, कर्मचारी आणि यस बँकेच्या एका माजी कर्मचाऱ्याच्या ठिकाणांवर छापेमारी केली. ईडीची चौकशी आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि २०१७-१८ दरम्यान मॅक्सस्टार मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि इतर कंपन्यांच्या येस बँकेकडील कर्जांच्या कथित बनावट हस्तांतरणाशी संबंधित आहे. तपास यंत्रणेनुसार, मनी लॉण्ड्रिंग आणि आर्थिक गैरव्यवहारांशी संबंधित पुरावे गोळा करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. तपासादरम्यान ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपन्या आणि येस बँक यांच्यात संगनमत करून परस्पर व्यवहार करण्यात आल्याचा संशय ईडीला आहे. या व्यवहारांच्या माध्यमातून अडचणीत असलेल्या मालमत्तांवर अयोग्य पद्धतीने नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे.

# नागपुरात हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्पाला मंजुरी

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाने नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारण्यास मंजुरी दिली आहे. मध्य भारतातील हा पहिलाच आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार असून, अत्याधुनिक वैद्यकीय निदान सुविधांमुळे हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर या प्रकल्पाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. आधुनिक वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता वाढविणे आणि गंभीर आजारांचे लवकर निदान करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रणालीच्या मदतीने विविध रेडिओफार्मास्युटिकल्सची निर्मिती करता येणार आहे. त्यामुळे रुग्णांना आजाराचे निदान अधिक जलद आणि अचूकपणे होऊ शकणार आहे. सध्या अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा देशातील मोजक्याच शहरांमध्ये उपलब्ध आहेत.

नागपुरात हा प्रकल्प उभारल्यानंतर विदर्भ, मराठवाडा, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि मध्य भारतातील इतर भागांतील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे.

# सरकारी बँका, कंपन्यांचे पुन्हा खासगीकरण गरजेचे नीती आयोगाच्या माजी उपाध्यक्षांचे स्पष्ट मत

■ दिल्ली

**नीती** आयोगाचे माजी उपाध्यक्ष आणि १६ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अरविंद पनगढिया यांनी 'विकसित भारत' च्या उद्दिष्टांसाठी सरकारी कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खासगीकरणाला गती देणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले आहे.

पनगढिया यांच्या मते, आर्थिक सुधारणांसाठी खासगीकरण आवश्यक आहे. हेच आर्थिक सुधारणांचे अविभाज्य अंग आहे. अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि राजकोषीय दबावाचा विचार न करता खासगीकरण कार्यक्रम राबवणे अत्यंत गरजेचे आहे. सध्याचे निर्गुंतवणूक विभाग खासगीकरणाची गती राखण्यात अपयशी ठरल्यामुळे, प्रक्रियेला वेग देण्यासाठी एक स्वतंत्र खासगीकरण मंत्रालय असायला हवे. सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तब्बल दोन डझन सार्वजनिक बँकांची गरज आहे, हा युक्तिवाद चुकीचा आहे.

पनगढिया हे रुपयाच्या घसरणीबाबत म्हणाले की, रुपया आता ओव्हरव्हॅल्यूड म्हणजेच अवाजवी मूल्य असलेला नाही, असे मानणे योग्य ठरेल. कारण अलीकडेच या अवाजवी मूल्यामध्ये बरीच सुधारणा झाली आहे. २००२-०३ मध्ये रुपया प्रति डॉलर अंदाजे ४८ वर होता आणि नऊ वर्षांनंतर २०११-१२ मध्ये तो ४७ वर होता. यामुळे त्या काळात रुपयाचे वास्तविक मूल्य खूप जास्त राहिले होते. २०११-१२ नंतर रुपयाच्या मूल्यातील सुधारणा संथ होती. परिणामी, भारताची व्यापारी निर्यात २०११-१२ मधील ३१० अब्ज डॉलरवरून घसरून २०१५-१६ मध्ये २६० अब्ज डॉलर झाली आणि २०१९-२० मध्ये ती केवळ ३२० अब्ज डॉलरपर्यंत वाढू शकली.

रुपयाचे अवमूल्यन वेगाने होऊ देऊन आपण आता एका चांगल्या वळणावर आहोत.

# राखीव जागांवरील लोकप्रतिनिधींना प्रमाणपत्रासाठी ६ महिन्यांची मुदतवाढ

■ मुंबई

**स्थानिक** स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींमधील राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या सदस्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. जात पडताळणी प्रक्रियेला लागणारा कालावधी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ही मुदतवाढ देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

# ग्रामीण भागाला वर्षभर शुद्ध पाणी राज्य सरकारचे धोरण जाहीर

## मंत्रिमंडळाचा निर्णय

■ मुंबई

**राज्यात** मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि अनेक भागांत पावसाने ओढ दिल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दरवर्षी भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरण २०२६' जाहीर केले आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत हे धोरण संपूर्ण राज्यात टप्प्याटप्प्याने राबवले जाणार आहे.

या नव्या धोरणाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना वर्षभर स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकर किंवा अन्य तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून राहण्याऐवजी दीर्घकालीन आणि शाश्वत व्यवस्था उभारण्यावर सरकारचा भर असणार आहे. धोरणाअंतर्गत ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास करण्यात येणार असून, विविध पाणीपुरवठा योजनांचे एकत्रिकरण करून अधिक परिणामकारक व्यवस्थापन केले जाणार आहे.

तसेच अनेक वर्षांपासून रखडलेल्या किंवा अपुऱ्या क्षमतेने सुरू असलेल्या जुन्या पेयजल योजनांचे पुनरुज्जीवन करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे.

# ट्रान्सजेंडर कायदा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

■ नवी दिल्ली

**ट्रान्सजेंडर** व्यक्ती अधिकारांचे संरक्षण सुधारणा अधिनियम २०२६ मधील तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिकांवरील विविध उच्च न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या सुनावण्यांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. संबंधित प्रतिवाद्यांना नोटीस बजावत पुढील सुनावणीपर्यंत उच्च न्यायालयांतील कार्यवाही थांबवण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्याचे नियोजन आहे. मुख्य न्या. सूर्यकांत आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांनी राजस्थान, कर्नाटक, केरळ आणि दिल्ली उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात वर्ग करण्याची मागणी केली होती. सुनावणीदरम्यान खंडपीठाने संकेत दिले की, विविध उच्च न्यायालयांतील प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याचा किंवा सर्व प्रकरणे एकत्र करून एखाद्या उच्च न्यायालयाकडे सुनावणीसाठी सोपवण्याचा पर्याय विचाराधीन आहे.

# अभिनेत्री संचिता उगलेचा छळ केला जात होता! कुटुंबियांचा आरोप


■ वसई

**टीव्ही** अभिनेत्री संचिता उगलेच्या मृत्यूचे गूढ आता वाढले आहे. संचिताचा छळ केला जात होता असा आरोप आज तिच्या कुटुंबियांनी केला आहे. याप्रकरणी सखोल तपासाची मागणी कुटुंबियांनी केली आहे.

टीव्ही अभिनेत्री संचिता उगले (२२) हिने रविवारी संध्याकाळी नालासोपारा येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी तिने कुठलीही चिठ्ठी लिहिली नसल्याने आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नाही. काल संचिताचा चुलत भाऊ आकाश उगले याने एका इन्स्टाग्राम आयडीचा दाखला देत अभिनेता सुशांतसिंह राजपूत आणि संचिताने एकाच दिवशी आत्महत्या केल्याचे सांगितले होते. आज तिच्या कुटुंबियांनी याप्रकरणी आणखी गंभीर आरोप केले आहेत,

संचिता मानसिक त्रासातून जात होती. सहकलाकारांपैकी किंवा ओळखीतील कोणीतरी व्यक्ती तिचा मानसिक छळ करत होता असा खळबळजनक आरोप संचिताच्या मावशीने केला आहे. ती नैराश्यात असायची. पण तिने आम्हाला स्पष्ट काही सांगितले नाही, असे मावशीने सांगितले. सखोल तपासातून सत्य बाहेर येईल, असा दावा त्यांनी व्यक्त केला. संचिता आनंदी वाटत असली तरी अचानक नैराश्यात जात होती. रविवारी ती अर्धा तास घरात एकटी होती आणि त्यात घात झाला, असे वडील मच्छिंद्र उगले यांनी सांगितले.

# नवाकाळ शब्दकोडे १६३९



**आडवे शब्द -**

२. गोष्ट, कहाणी ४. आकड्यांच्या स्वरूपात दिलेली माहिती, सांख्यिकी ७. महादेव ९. आग्रह, हट्ट ११. रुग्णालयात नेण्याआधी केलेले तातडीचे जुजबी उपचार १३. फळाची अपेक्षा ठेवून केलेले सत्कर्म १५. एजंट, अडत्या १६. खोरे १९. दागिना २०. लगामाची दोरी २२. पाचपोच, तारतम्य २६. कळस, पूजेतील तांब्या २८. खडूस, तिरसट २९. वजनदार ३०. वाऱ्याने होणारा झाडांच्या पानांचा आवाज ३१. कमी उंचीचा ३२. शंभर सेंटीमीटर ३४. लाकडी आसनप्रकार ३६. चोप ३७. हत्ती ३८. रावा, राघू ४१. खिसेकापू ४३. टिकाऊपणा ४४. भूकंपाची तीव्रता मोजण्याचे मापक ४६. गलका, गोंगाट ४९. महीपाल, नृपती ५०. अनेक, कैक ५१. रास, चळत ५४. वरी, नाचणीसारखी हलकी तृणधान्ये ५५. एक प्रकारचे रेशमी जाड कापड ५७. रिकामा, रिक्त ५८. चर्चासत्राच्या आरंभी केलेले दिशादर्शक भाषण ६२. चेहरा ६४. निरंतर, सतत ६७. सोन्या-चांदीची जर ६९. नोकराने मागितलेली सुट्टी ७०. डोळ्यांना आनंद देणारे, नेत्रसुखद ७३. मेहनत ७४. चेष्टा ७५. माणसे, लोक ७६. चोपडी ७८. आकर्षक ८०. मातबर, अभिजन ८१. आईचा भाऊ ८२. मैत्रीण ८३. स्त्रियांचा गळ्यातील अलंकार ८५. चाकू, मदिरा ८७. पती, यजमान ८९. नौबत ९०. फोडणीतला एक पदार्थ, पोटदुखीवर हा गुणकारी आहे. ९१. विषय, बाब ९३. निरागस, साधा ९५. अनुचर, शिपाई ९७. व्यवस्थित १००. विनोबांनी केलेला गीतेचा सोपा अनुवाद १०१. वायू १०३. मुलगी, कन्या १०५. अंत, मर्यादा १०७. हजामत १०८. स्वच्छ व चमकणारे १०९. अशक्त, दुबळा ११०. सारखा

**उभे शब्द -**

१. वाईट चाल २. कमळ ३. खोटे विधान ४. अंकुर, मोड ५. मोठे भांडे, हंडा ६. अस्वल ७. आकाश, गगन ८. केसांची आकर्षक रचना व प्रसाधन ९. महिष, रेडा १०. दिवंगत १२. पिवळ्या रंगाचे सुगंधी फूल १४. प्रसंग १५. मजबूत १७. मोठा माठ, रांजण १८. मग्न, रमलेला २०. कृष्णजन्माची तिथी २१. दृष्टी २३. ध्येय, उद्दिष्ट २४. विस्मरण, विस्मृती २५. लाकूड खाणारा कीटक, वाळवी २७. चमक ३१. अनावश्यक प्रमाणात उपलब्धता ३३. धडक ३४. शिल्लक, शेष ३५. खडे सैन्य ३६. हानिकारक ३७. फुलांचा एक अलंकार ३९. निर्मिती, साकार करणे ४०. रुग्णसेविका ४१. साडीचा पदर ४२. मेंढीचे केस ४५. रंगीत अक्षरलेखन व लहान चित्रांसाठी मऊ व जाड टोकाचे पेन ४७. मीठ, नमक ४८. काठी, बडगा ५०. आद्य कीर्तनकार ५२. राजाचा लेखनिक ५३. उजेड, तेज ५६. नवऱ्याची दुसरी बायको ५९. सांभाळ ६०. कार्तिकस्वामी ६१. अशुद्ध रक्तवाहिनी ५३. आभाळ ६४. बकरी ६५. वृद्ध ६६. अपरिचीत ६७. धोतराचा उंची प्रकार ६८. तळाचा भाग ६९. फिरस्ता, गोसावी ७१. घरधनी ७२. ढोंगीपणा ७४. नेमस्त, पडखाऊ वृत्तीचा ७७. तुच्छ, दर्जाहीन ७८. तुपाचे पूर्वरूप, नवनीत ७९. बाळाच्या कपाळावर भविष्य रेखाटणारी देवी ८२. रुळलेला, सराव झालेला ८४. अभिप्राय; विचारधारा ८५. अदमासे, अंदाजे ८६. किंमत, मूल्य ८८. बोन मॅरो ९२. भूतबाधेचा कथित प्रकार ९३. मैत्रीण, सखी ९४. प्रश्न ९६. कांचन, सुवर्ण ९८. डोंगरातील खबदाड, दरड ९९. घर, सदन १०२. पुरुषांच्या मनगटावर वर्षातून एकदा बांधला जाणारा धागा १०४. दिवसाचा आठवा भाग, प्रहर १०६. विष्णूपत्नी, लक्ष्मी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३८ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अजब ४. असामी ६. भाला ८. पद ९. तापट ११. बनावट १२. वध १४. पद्धत १५. सुंबाल्या १६. अजानवृक्ष १७. कवठ १९. डफ २१. सुकामेवा २४. रसा २५. काष्ठ २६. केरळ २८. घटना ३०. मगर ३२. राळ ३३. सावाधावा ३६. मैना ३७. दशग्रीव ३९. आठवण ४०. कर्क ४१. दलदल ४३. गडप ४६. तडा ४७. सवालजवाब ५१. चळवळ ५४. शहाणीव ५६. लडिवाळ ५७. खग ५८. दर ६०. रज ६२. तंबी ६३. अपारदर्शक ६५. शवासन ६८. कवन ७०. शनी ७१. दरड ७२. माकडहाड ७४. खवखव ७६. कळशी ७७. वेळ ७८. तोरा ७९. परेश ८२. खास ८३. तोंड ८४. नवल ८५. खतरनाक ८८. सह्यगिरी ९०. पाड ९२. बंडाळी ९३. नाच ९४. शिवलीलामृत ९६. कंदी ९७. रास्त ९८. माधवी ९९. तटबंदी १००. नेम १०१. द्रुत १०२. खंजीर १०३. संजीवनी १०४. ललिता १०५. प्रेम

**उभे शब्द :** १. अनामिका २. जव ३. बट ४. अवजार ५. साधनसामग्री ७. लापशी ८. पतकर ९. ताबा १०. पल्याड १३. पक्षकार १५. सुंठ १८. वळसा २०. फत्ते २१. सुधा २२. मेघनाद २३. वाट २६. केळवण २७. मेधा २९. नाद ३१. गवगवा ३२. राठ ३४. वाकी ३५. वाकडा ३६. मैल ३८. शक्कल ३९. आप ४१. दर्या ४२. लसणी ४४. डबलबी ४५. ओळखपाळख ४६. तळ ४८. वावर ४९. जळू ५०. अवास्तव ५२. वगर ५३. फरक ५५. हाकेसरशी ५८. दर्शनीय ५९. वश ६१. जपमाळ ६२. तंगडतोड ६४. दश ६६. वादळ ६७. नड ६८. कड ६९. नखरेल ७३. हारा ७५. वश ७६. कडोसरी ७७. वेस ७९. पवन ८०. दूर ८१. चकचकीत ८२. खारी ८३. तोंडली ८५. खडा ८६. तळीराम ८७. नाना ८९. गिरीधर ९०. पावभाजी ९१. अमृत ९२. बंदी ९५. तटस्थ ९६. कंदील ९८. माजी १००. नेता १०१. द्रुम

# नीटच्या प्रश्नपत्रिका हवाईदलाच्या विमानाने पाठवल्या

पान १ वरून

एनटीएवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, पेपर तिथून फोडले जात आहेत. मात्र तसे न करता हवाईदलालापेपर पोहोचवण्याचे काम दिले जाते हे योग्य आहे का, असा सवाल विचारला जात आहे. इतकेच नव्हे तर टेलिग्रामवर बंदी कशासाठी आणली? फुटलेला पेपर व्हॉटसअॅप किंवा इतर माध्यमातूनही व्हायरल करता येतो. नीट, सीबीएसई अशा प्रत्येक परीक्षेवेळी असेच हास्यास्पद बाह्य उपाय करणार की आतील भ्रष्टाचार नष्ट करण्याचा प्रयत्न करणार हा सवाल आहे. यावेळी पेपर फुटला नाही तरी दरवेळी फुटणार नाही याची खात्री देता येईल असे कायमस्वरूपी उपाय करायला हवे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्थाच्या (एनटीए) मते, नीट पुनर्परीक्षेच्या नावाखाली टेलिग्रामवरील अनेक चॅनेल आणि गट विद्यार्थी व पालकांची फसवणूक करत होते. कथित प्रश्नपत्रिका उपलब्ध असल्याचे सांगत हजारो ते लाखो रुपयांची मागणी केली जात होती. परीक्षा सुरक्षित, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पडावी यासाठीच बंदीचा निर्णय घेण्यात आल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. या निर्णयावर अनेक स्तरांतून प्रश्न उपस्थित होत आहेत. व्हॉट्सअॅप, रेडिट, डिस्कॉर्ड, फेसबुक, इन्स्टाग्राम तसेच व्हीपीएनसारख्या माध्यमांद्वारे पेपरफुटी पुन्हा होऊ शकते. मग केवळ टेलिग्रामवर निर्बंध लावल्याने पेपरफुटी थांबेल का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, नीटची तयारी करणारे हजारो विद्यार्थी शेवटच्या टप्प्यात स्टडी ग्रुप्स, नोट आणि शंका निरसनासाठी टेलिग्रामचा वापर करतात. त्यामुळे या निर्बंधांचा फटका प्रामाणिक विद्यार्थ्यांनाही बसत असल्याची टीका होत आहे. टेलिग्राम बंद केल्याने पेपरफुटीची मूळ कारणे संपणार आहेत का? असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित होत आहे. देशभरात नीट-युजी परीक्षा ३ मे रोजी घेण्यात आली होती. ७ मे रोजी पेपर फुटल्याचे उघडकीस आले होते. महाराष्ट्रातील पुण्यातून प्रश्नपत्रिका फुटून ती डिजिटल माध्यमातून थेट राजस्थानमधील मुख्य हस्तकांपर्यंत पोहोचवण्यात आली. अॅप्स, प्रामुख्याने टेलिग्रामचा वापर करून प्रश्नपत्रिका उमेदवारांपर्यंत पोहोचवली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली आणि आता २१ जून रोजी पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. या फेरपरीक्षेला देशभरातील सुमारे २२ लाख विद्यार्थी बसणार आहेत. उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रात सर्वाधिक परीक्षा केंद्र आहेत. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांत एकूण ३५ परीक्षा केंद्र आहेत. या परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका पोहोचवण्यासाठी पहिल्यांदा वायुदलाची मदत घेण्यात आली आहे. अमरावती येथे वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टरमधून सुमारे ६ हजार प्रश्नपत्रिका दाखल झाल्या. त्यानंतर कडेकोट पोलीस बंदोबस्तात त्या जिल्हा कोषागाराच्या लॉकरमध्ये ठेवण्यात आल्या. अकोल्यातही वायुदलाच्या विशेष विमानातून प्रश्नपत्रिका पोहोचवण्यात आल्या. केंद्रीय सुरक्षा दल, भारतीय टपाल विभाग, जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रक्रिया पार पडली.

सीआयएसएफ, पोलीस, महसूल विभाग आणि इतर सुरक्षा यंत्रणा तैनात करून प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. नीट प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्यांना २१ जूनपर्यंत लॉकडाऊनमध्ये ठेवले जाणार आहे. पण प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक किंवा अंतर्गत यंत्रणांमधून होणाऱ्या संभाव्य पेपरफुटीवर या उपाययोजनांचा किती परिणाम होईल? असा सवाल उपस्थित होत आहे. यावर उबाठा खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्या म्हणाल्या की, पंतप्रधान कार्यालय, भारतीय हवाई दल, सीआरपीएफ, सीआयएसएफ, सीसीटीव्ही, जीपीएस ट्रॅकिंग, बहुस्तरीय तपासणी आणि टेलिग्रामवरील बंदी अशा सर्व यंत्रणा एका फेरपरीक्षेसाठी वापराव्या लागत आहेत. यावरून पेपर लीक माफियाने संपूर्ण व्यवस्थेलाच गुडघ्यावर आणले आहे.

## फेरपरीक्षेच्या एक दिवस विद्यार्थ्यांना दिल्लीत येण्याचे दीपकेचे आवाहन

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी जयपूर येथे आंदोलनादरम्यान झालेल्या हल्ल्यानंतरही आपली भूमिका कायम ठेवत आज नागपुरात आंदोलन केले. यावेळी त्यांनी २० जून रोजी दिल्ली येथे देशभरातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करावी, असे आवाहन केले. २१ जून रोजी नीट (यूजी) फेरपरीक्षा होणार असताना त्याआधी एक दिवस २० जूनला दिल्लीत आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

याबाबत दीपके यांनी सांगितले की, परीक्षांमधील कथित घोटाळे, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि जबाबदारीच्या अभावामुळे देशाचे मोठे नुकसान होत आहे. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर देशातील विविध शहरांमध्ये शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन सुरूच राहील. पुण्यानंतर लखनऊ, जयपूर, बंगळुरू आणि नागपूरमध्येही आंदोलन करण्यात येत आहे. त्यानंतर २० जून रोजी दिल्लीत देशभरातील विद्यार्थी एकत्र येऊन शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतील. राजीनामा मिळाल्याशिवाय माघार घेणार नाही. माझ्यावर झालेला हल्ला हा वाढत्या बेरोजगारीचेही प्रतीक आहे. काही तरुणांना थोडे पैसे देऊन अशा प्रकारच्या कृत्यांसाठी वापरले जाते. त्यांच्याकडे रोजगार असता तर त्यांनी असे प्रकार केले नसते. काँग्रेसने चुकीचे केले म्हणूनच भाजपाला लोकांनी सत्तेत बसवले. परंतु, त्यांच्याकडूनही निराशाच झाली.

# विकसित भारत योजनेसाठी कायद्यात सुधारणा

**मुंबई** - केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी विकसित भारत-जी राम जी उपक्रमाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, संबंधित अध्यादेश काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारने लागू केलेल्या विकसित भारत-जी राम जी कायदा, २०२५ मधील तरतुदींशी राज्यातील विद्यमान रोजगार हमी कायदा सुसंगत करण्यासाठी ही दुरुस्ती करण्यात येणार आहे.

# परळ-लालबागमध्येही पांढऱ्या पट्ट्या

पान ८ वरून

काही ठिकाणी महानगरपालिका प्रशासनाला रंगवलेले पट्टे पुसण्याची कारवाई करावी लागल्याचेही सांगितले जाते. त्यामुळे हा मुद्दा केवळ स्थानिक न राहता शहरव्यापी चर्चेचा विषय बनला. आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर कारवाई केली जाते, पण सार्वजनिक रस्त्यांवर विनापरवानगी रंगकाम करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई का होत नाही, असा प्रश्न मनसेकडून विचारण्यात आला आहे. मनसे नेत्यांचे म्हणणे आहे की, सार्वजनिक मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे रंगकाम किंवा चिन्हांकन करण्यासाठी अधिकृत परवानगी आवश्यक असेल, तर हा नियम सर्वांसाठी समान असायला हवा. अन्यथा प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होते

या मुद्द्यावर केवळ मनसेच नव्हे तर उबाठानेही आक्षेप घेतला आहे. सार्वजनिक रस्त्यांचा वापर कोणत्याही एका समुदायाच्या सोयीसाठी केला जाऊ नये, अशी भूमिका विरोधकांकडून मांडली जात आहे. दुसरीकडे, जैन समाजातील प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, हा धार्मिक श्रद्धा आणि परंपरेशी संबंधित विषय असून, त्याला अनावश्यक राजकीय रंग दिला जात आहे. पोलिसांनी मनसैनिकांवर नोटिसा बजावल्यानंतर या वादाला नवे वळण मिळाले आहे. आता प्रशासन विनापरवानगी रंगकाम करणाऱ्यांवरही कारवाई करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, हा मुद्दा सर्वप्रथम चर्चेत आणणारे इन्फ्लुएन्सर प्रसाद वेदपाठक यांनी मनसे नेते संदीप देशपांडे यांची भेट घेतली. ते म्हणाले की, आमचा विषय प्रॉपर्टी संबंधित होता, तिथे पांढरा पट्टा मारला होता. त्यानंतर तो पट्टा मिटवला. मात्र त्यानंतर जे सुरू आहे, ते राजकारण आहे. माझ्या विरोधात सुद्धा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न झाला. या चोराच्या उलट्या बोंबा सुरू आहेत. मनसेने आमच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. आमच्यासोबत ते उभे राहिले. प्रवीण छेडा यांनी आमच्या विरोधात आंदोलन केले. सगळ्यात जास्त मते मराठी माणसांची असतात. मराठी माणसांसोबत एकच पक्ष आहे. तो म्हणजे मनसे. त्यामुळे आज मी त्यांना भेटायला आलो आहे. घरी काही लोक धमकाविण्यासाठी येत आहेत. काही लोक सतत आमच्या मागे पुढे फिरतात. रेफ्युजी सारखे फिरावे लागते. माझ्या बाजूने, भूमिपुत्रांच्या बाजूने तिथे कोणी उभे राहत नाही. अख्खी सोसायटी माझ्या विरोधात गेली आहे.

# वर्धापन दिनाआधीच 'ऑपरेशन टायगर'

पान १ वरून - संजय राऊत आणि अनिल देसाई यांना खासदारांच्या संपर्कात राहण्यास सांगितले आहे. याबाबत बोलताना उबाठा विधानपरिषद आमदार अंबादास दानवे म्हणाले की, मला असे वाटते की अनेक गोष्टी कपोलकल्पित सांगितल्या जात आहेत. आम्ही माहिती घेतली त्यानुसार काहीजण दिल्लीला असू शकतात. परंतु काहीजण राज्यातच त्यांच्या मतदारसंघात आहेत. खा. नागेश आष्टीकर यांचा मुलगा विधानपरिषदेचा उमेदवार आहे ते इथेच आहे, खा. ओमराजे निंबाळकर यांचा मुलगा रुग्णालयात आहे तेही त्यांच्या मतदारसंघात आहेत. काही खासदार नॉट रिचेबल असण्याबाबत ते म्हणाले की, माझा फोन बंद झाला म्हणजे मी कुठे जाणार असा अर्थ होत नाही. उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने मी काही लोकांशी संपर्क साधला. तर खा. संजय राऊत यांनी एक्स पोस्ट केली की, अपना सपना मनी..मनीन् महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्यासाठीआज रात्री प्रत्येकी १५ कोटींचा अॅडव्हान्स देण्यात येत असल्याची माहिती धक्कादायक आणि घृणास्पद आहे!

दरम्यान, शिवसेना उबाठा आणि शिवसेना शिंदे गट यांनी १९ जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापन दिनाची तयारी सुरू केली आहे. उबाठाचा वर्धापनदिन षण्मुखानंद हॉलमध्ये तर शिंदे गटाचा वर्धापनदिन सोहळा गोरेगावच्या नेस्को एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. मात्र उबाठाच्या वर्धापनदिनावर 'ऑपरेशन टायगर'चे सावट असणार आहे.

# महिला बचत गटांना एक हेक्टर जमीन

पान १ वरून

या जमिनींचा वापर झाल्यास रोजगारनिर्मितीसह सरकारी जमिनींचे संरक्षणही होईल, असे सरकारचे मत आहे.

याबाबत चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच पडीक सरकारी जमिनींचे संरक्षण आणि उत्पादनक्षम वापर हा या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. नव्या धोरणानुसार महिला बचत गट किंवा महिला सहकारी संस्थांना महसूल विभागाच्या मालकीची एक हेक्टर जमीन पाच वर्षांसाठी वापरण्यास दिली जाईल. या जमिनीवर चारा लागवड, बांबू लागवड, नेपियर गवताची शेती तसेच ग्रासलँड डेव्हलपमेंटसारखे विविध प्रकल्प राबविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमांसाठी प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार असून, हा निधी जिल्हा नियोजन समिती किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

# पुणेकरांवर तिसऱ्यांदा भुर्दंड सीएनजी-पीएनजी दरवाढ

पान १ वरून

लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे सीएनजी वाहनधारकांसह घरगुती पीएनजी ग्राहकांनाही अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

केंद्र सरकारने डिझेल आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (एटीएफ) च्या निर्यातीवरील शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या नियमांनुसार डिझेलच्या निर्यातीवर प्रति लीटर १४ रुपये आणि एटीएफच्या निर्यातीवर प्रति लीटर १२.५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. देशांतर्गत बाजारात इंधनाचा पुरेसा पुरवठा राखण्यासाठी आणि अमर्याद निर्यातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. पेट्रोलच्या निर्यात शुल्कात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.


मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९ च्या नियम १७(४) अन्वये सूचना

**द क्रॉसिंग रिट्रीट एलएलपी**

**एलएलपीआयएन: एसीपी-७१९१**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **द क्रॉसिंग रिट्रीट एलएलपी** (एलएलपीआयएन: **एसी-पी-७१९१**), जी मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ अन्वये स्थापित एक मर्यादित दायित्व भागीदारी संस्था आहे आणि जिचे सध्याचे नोंदणीकृत कार्यालय **इमा.५, फ्लॅट २३, एल अँड टी सीएचएस, विजय नगर, अंधेरी पूर्व, मारोल नाका, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५९** येथे असून कंपनी रजिस्ट्रार, मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत आहे, आपले नोंदणीकृत कार्यालय **महाराष्ट्र** राज्यातून **गोवा** राज्यात स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव देत आहे.

एलएलपीचा प्रस्तावित नवीन नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता **कार्यालय क्र.३-एफ, तिसरा मजला, राजवाडो, म्हापसा, बार्देझ, गोवा - ४०३५०७** असा असेल.

नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीच्या हितावर परिणाम होण्याची शक्यता आहे, त्यांनी आपले आक्षेप, काही असल्यास, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **२१ (एकवीस) दिवसांच्या** आत, कंपनी रजिस्ट्रार, गोवा यांच्याकडे आणि एलएलपीच्या उपरोक्त पत्त्यावरील नोंदणीकृत कार्यालयात सादर करावेत.

सदर सूचना मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या कलम १३(४) सह वाचन करून, मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९ च्या नियम १७(४) च्या अनुपालनात प्रकाशित करण्यात येत आहे.

**द क्रॉसिंग रिट्रीट एलएलपी साठी**
सही/-
**सिनी जॉर्ज**
**नियुक्त भागीदार**
डीआयएन : ०९२७७७३६

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** जून १७, २०२६



**जाहिर सूचना**

प्रति.
१. यशवंत बाबु राऊत (मयत तर्फे वारस)
 १.१ श्रीमती अल्का यशवंत राऊत
 १.२ श्री. पियुश यशवंत राऊत
 दोघे रा.अग्नीदेवी कृपा,४था मजला,रुम नं.१४, ठाकुरवाडी नं.१. दिंदयाळ रोड,डोंबिवली(प), जि.ठाणे
 १.३ श्रीमती कोमल हेमंत मिश्रा
 रा. समर्थ कृपा अपार्टमेंट, स्वामी समर्थ मठासमोर, रुम नं.३०२, नंदीवली, डोंबिवली (प), जि. ठाणे
 १.४ श्रीमती स्नेहल विनोद गायकर
 रा. सेक्टर-१५, कृष्णाई टावर, ७ वा मजला, घनसोली (प), जि. ठाणे.
२. कै. श्रीराम बाबु राऊत (मयत तर्फे वारस)
 २.१ श्रीमती कांता श्रीराम राऊत
 २.२ श्री. रिशिकेष श्रीराम राऊत
 दोघे रा. मोहाचीवाडी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
 २.३ श्रीमती स्वप्नाली श्रीकांत राऊत
 रा. मोहागांव (शिवकर), ता. पनवेल, जि. रायगड
३. कै. लक्ष्मण बाबु राऊत (मयत तर्फे वारस)
 ३.१ श्रीमती वैशाली लक्ष्मण राऊत
 ३.२ श्रीमती दर्शना लक्ष्मण राऊत
 ३.३ श्री. शिवम लक्ष्मण राऊत
 सर्व रा. किशोरे स्प्रिती, रुम नं.२. रिक्षा स्टॉड जवळ, जुनी डोंबिवली, जि. ठाणे
४. कै. नारायण बाबु राऊत (मतय तर्फे वारस)
 ४.१ श्रीमती सुभद्रा नारायण राऊत
 ४.२ श्री. महेश नारायण राऊत
 दोघे रा. खांदा, मोहाची वाडी, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
५. श्रीमती मथुरा जाधव (मयत तर्फे वारस)
 ५.१ श्री. दिपक मनोहर मोहाची जाधव
 रा.. खांदा, मोहाची वाडी, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
६. श्रीमती कुसुम बाबु राऊत
 (लग्ना आधिचे नाव श्रीमती कुसुम गजानन गायकवाड)
७. श्रीमती मंजुळा बाबु राऊत
 (लग्ना आधिचे नाव श्रीमती मंजुळा वसंत पवार)
८. श्रीमती गुलाब बाबु राऊत
 (लग्ना आधिचे नाव श्रीमती गुलाब वसंत पावर)
 मयत तर्फे वारस
 ८.१ श्री. सचिन वसंत पवार
 ८.२ श्री. भास्कर वसंत पवार
 क्र. ७ ते ८.२ रा. धाकटे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड .... अर्जदार

**विरूध्द**

१. के. धोंडु बुटाजी क्षीरसागर (मयत तर्फे वारस)
 १.१ श्रीमती गुलाब धोंडु क्षीरसागर
 १.२ श्री. प्रकाश धोंडु क्षीरसागर
 रा. भाक्रीचा पाडा. पो. सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड
 १.३ श्री. मंगेश धोंडु क्षीरसागर
 रा. रा. गणेगांव चिचवली, ता. कर्जत, जि. रायगड
 १.४ श्रीमती जनाबाई चव्हाण
 रा. मोहाचीपाडी, साईनगर, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
२. श्री. अनंत बुटाजी क्षीरसागर
३. श्री. सोमनाथ दुंदा क्षीरसागर
४. श्रीमती कांता घनश्याम जाधव
 क्र. २ ते ४ सर्व रा. भाक्रीचा पाडा, पो. सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड
५. श्रीमती अंजना लक्ष्मण राऊत
 रा. भिमराव ठाकुर चाळ, साईप्रसाद बिल्डींग समोर,ठाकुरवाडी,डॉबिवली (प), ता.कल्याण, जि. ठाणे
६. श्रीमती शांता भाऊ पांडवे
 रा. आपटी गाव, वावोशी, ता. खालापूर, जि. रायगड
७. श्रीमती रंजना हरिश्चंद्र गायकवाड
 रा. किशोरीगांव, ता. मुरबाड, जि. ठाणे
८. के. विष्णु देहु क्षीरसागर (मयत तर्फे वारस)
 ८.१ श्री. दिलीप विष्णु क्षीरसागर
 रा. भाक्रीचा पाडा, पो. सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड
 ८.२ श्रीमती माई विष्णु क्षीरसागर
 (लग्ना आधिचे नाव सुरेखा दिलीप पवार) रा. टेपआळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
 ८.३ श्रीमती ताई विष्णु क्षीरसागर
 (लग्ना आधिचे नाव सविता आनंत रसाळ) रा. उरण, जि. रायगड
 ८.४कै. विलास विष्णु क्षीरसागर (मयत तर्फे वारस)
 ८.४.१ श्रीमती शलका विजय पांडवे
 रा. आपटीगांव, पो. वावेशी, ता. खालापूर, जि. रायगड
 ८.४.२ श्रीमती हर्शदा विलास क्षीरसागर
 रा. भाक्रीचा पाडा, पो. सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड
९. श्री. किशोरे हरिभाऊ क्षीरसागर
 रा. टेपआळी, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
१०. श्री. दिनेश कन्हैयालाल दोशी
११. श्री. अरविंद मोतीलाल धाकड
 दोघे रा. बी/५११, कर्णाळा, बिसनेस सेंटर, घाटकोपर, अंधेरी लिक-रोड मुंबई
१२. श्री. श्रीराम दाजी राणे
 रा. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
 **सामनेवाले**

**विषय:-** अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्रं. हक्कनोंद/ अपिल क्र. ०९/ २०२४, दि.१०/०६/२०२५ चेविरुध्द पुनरिक्षण अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील पुनरिक्षण अर्जाची सुनावणी (विलंबाच्या व दाखल करुन घेण्याच्या मुद्यावर) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २३.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास पुनरिक्षण अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले) कोकण विभाग**

नवा काळ

• मुंबई । बुधवार १७ जून, २०२६ • पान -८

# जनरल इन्शुरन्समधील ५ टक्के भांडवल सरकार विकणार




**नवी दिल्ली** - जनरल इन्शुरन्स कंपनी (जीआयसी) या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीतील ५ टक्के भागभांडवल निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून विकण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यानुसार आज मंगळवार आणि उद्या बुधवार असे दोन दिवस ऑफर फॉर सेलच्या (ओएफएस) माध्यमातून समभाग विक्री होणार आहे. ओएफएसमध्ये आज संस्थात्मक गुंतवणुकदारांसाठी तर उद्या किरकोळ गुंतवणुकदारांसाठी हे समभाग विक्रीस उपलब्ध असतील. ३५२ रुपये प्रति समभाग या आधारभूत किमतीवर ८.७७ कोटी समभाग विकून ३ हजार कोटी रुपयांचा महसूल सरकारला उपलब्ध होणार आहे. एकूण ५ टक्के समभाग विक्रीपैकी २ टक्के ओएफएसद्वारे तर ३ टक्के ग्रीन शू ऑप्शनच्या माध्यमातून विकले जाणार आहेत.

## बिल्डिंगवर गुजराती भाषेत नाव बघितलं आणि...

**जैन समाजाने मारलेल्या पांढऱ्या पट्टीवर ग्राऊंड रिपोर्ट करताना घाटकोपरमध्ये दिसलेली ही बिल्डिंग आहे. जिचं नाव थेट गुजरातीत मोठ्या अक्षरात लिहिलंय. आजूबाजूला सहज नजरेस पडेल, असं मराठीतलं नाव दिसतही नाही. बिल्डिंगच्या एका कोपऱ्यावर इंग्रजीतून नाव आहे. पण दुसऱ्या कोपऱ्यावरही मराठी नाही.**

**बिल्डिंगचं** नाव कळायला काही जास्तीची सेकंद लागतात. हा सगळा जैन, गुजराती बहुल भाग आहे. इथे अनेक सोसायट्या अशा आहेत की जिथे फक्त विशिष्ट धर्माचे, भाषेचे लोक राहतात. त्यामुळे नाव गुजरातीत का? मराठीत का नाही? हे विचारायलाही कुणी नसावं. कुणी आपलं काही वाकडं करू शकत नाही, याच वाटण्यातून बळावलेली ही वृत्ती आहे, असं इथल्या मराठी लोकांना वाटतं. पण जेव्हा अशी भाषिक, सांस्कृतिक अतिक्रमणं होतात तेव्हा, 'तिथे होतंय, त्याच्यासोबत होतंय, मग तो बघेल', अशी भूमिका घेऊन आपण अलिप्त राहतो. त्यातूनच ही अतिक्रमणं पसरत जातात. मुंबई आमची आहे आणि तिची भाषा मराठीच आहे. तिथल्या कुठल्या एका एरियाची गुजराती वगैरे भाषा असूच शकत नाही, हे सांगायला बहुधा मराठी माणूस कमी पडतो. अथवा ते आपलं काम नाही, ते काम करायला शिवसेना, मनसेसारखे पक्ष आहेत. ते काय ते बघून घेतील, खळ्ळखट्याक-बिट्याक करतील, असा विचार करून शांत बसतो. प्रसाद वेदपाठक या सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सरने आवाज उठवला. पण त्याने यापूर्वी असे अनेक प्रसिद्ध स्टंट केलेले आहेत. त्यामुळे यातूनही त्याला प्रसिद्धीच मिळवायचीय. हा शिक्का स्वाभाविकपणे बसला. ज्या सोसायटीत जैन धर्मीयांनी




पांढरी पट्टी मारली होती, ती जागा या वेदपाठक यांच्या मालकीची असल्याने, तो ती लढाई जिंकला. पांढरी पट्टी गेली. पण घाटकोपरमध्ये जैन बहुल सोसायट्या सोडाच, फुटपाथवरही या अशा पांढऱ्या पट्ट्या दिसतात. मी त्यातल्या

**- गुरुप्रसाद**

अनेक पट्ट्यांवर चालत चालत परवा ग्राऊंड रिपोर्ट करून आलो. या पट्टीवर ऊन किती लागतं, थंडावा किती मिळतो, वगैरेही बघून आलो. आता ती पट्टी पालिकेने मारली आहे? की तिथल्या जैन मंदिरांनी?, हे शोधावं लागेल. कुणाची परमिशन घेऊन मारली आहे, की सब चलता है, या अविर्भावात मारली आहे, हेही पाहावं लागेल. खरंतर एका पांढऱ्या पट्टीने काहीही होत नाही. ती असली काय किंवा नसली काय, फक्त पांढऱ्या पट्टीआडून कुणी आपल्या हक्काच्या जमिनीवर आपली ओळख तर छापत नाहीये ना? याचा विचार करायला हवा. प्रसाद वेदपाठकने केलेला हा प्रसिद्धीस्टंटच आहे, हे गृहित धरून का होईना, पण या निमित्ताने या प्रश्नावर विचार करायला हवा.

घाटकोपरमध्ये फिरून हे सगळं मांडलंय. जे दिसलंय ते दाखवलंय. त्यातलं काय चांगलं काय वाईट? हे बघणाऱ्याने ठरवायचंय.

## 'देवाभाऊ' आणि 'छावा' टॅक्सी लवकरच मुंबईत धावणार

■ मुंबई

**मुंबईत** प्रवाशांसाठी ओला आणि उबेरसारख्या खासगी ॲप-आधारित टॅक्सी सेवांना पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने मोठी तयारी सुरू केली आहे. प्रवाशांना कमी दरात प्रवासाची सुविधा आणि टॅक्सी चालकांना अधिक आर्थिक लाभ मिळावा या उद्देशाने 'देवाभाऊ सहकार' आणि 'छावा' या दोन टॅक्सी सेवा लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. दिल्ली आणि कोलकाता येथे सरकारी पाठबळ असलेल्या टॅक्सी सेवांना प्रतिसाद मिळाल्यानंतर महाराष्ट्रातही त्याच धर्तीवर 'देवाभाऊ टॅक्सी' आणि 'छावा टॅक्सी'साठी स्वतंत्र ॲप विकसित करण्यात येत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या भारत टॅक्सी मॉडेलच्या धर्तीवर ही योजना आकार घेत आहे. या प्रकल्पाला राज्य सरकारने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात विशेष बैठक घेऊन योजनेला हिरवा कंदील दाखवला असून, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यासाठी आवश्यक धोरणात्मक आणि कायदेशीर बाबींची पूर्तता केल्याची माहिती आहे.

## परळ-लालबागमध्येही पांढऱ्या पट्ट्या मनसैनिकांनाच पोलिसांची नोटीस

■ मुंबई

**मुंबईतील** घाटकोपर, दादर आणि गिरगावनंतर आता परळ-लालबाग येथील राजकमल स्टुडिओ परिसरातील एका सोसायटीच्या आवारातही पांढऱ्या रंगाच्या पट्ट्या आखण्यात आल्या आहेत. तर दुसरीकडे या प्रकरणात आंदोलन करत पांढऱ्या पट्टीवर स्प्रे मारणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांना पोलिसांनी नोटीस बजावली असून, सरकारी आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. मात्र पांढऱ्या रंगाच्या पट्ट्या आखणाऱ्या लोकांवर कोणतीही कारवाई केली नसल्याने मनसैनिकांनी संताप व्यक्त केला आहे.



गिरगाव परिसरातील फुटपाथ आणि रस्त्यांवर काढण्यात आलेल्या पांढऱ्या पट्ट्यांविरोधात मनसेने आंदोलन छेडले होते. या आंदोलनादरम्यान काही मनसैनिकांनी पांढऱ्या पट्टीवर करड्या रंगाचा स्प्रे मारून निषेध नोंदवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी संबंधित कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले होते. आता या घटनेप्रकरणी त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या वादाची सुरुवात झाल्यानंतर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दादर परिसरात आक्रमक भूमिका घेतली होती. मुंबई महानगरपालिकेने रस्त्यावर काढलेली पांढरी पट्टी तातडीने हटवावी, अशी मागणी त्यांनी केली होती. मनसेच्या आंदोलनानंतर » पान ७ वर

## होर्मुजमधून इंधन-खताची ३४ जहाजे निघाली! लवकरच भारतात पोहोचणार

■ तेहरान

**अमेरिका-इराण** यांच्यातील युद्धबंदी करारानंतर होर्मुज सामुद्रधुनीतून अनेक व्यापारी जहाजांनी भारताच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे. इंधन आणि खतांचा साठा घेऊन येणारी ३४ जहाजे आखाती देशांतून निघाली असून, लवकरच भारतीय बंदरांवर पोहोचण्याची शक्यता आहे. यामुळे इंधन आणि कृषी क्षेत्रातील पुरवठा साखळीला मोठा आधार मिळणार आहे.

एलएनजी वाहून नेणाऱ्या एका मोठ्या जहाजाने होर्मुज सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करत भारताच्या दिशेने प्रवास पूर्ण केला आहे. यामुळे इतर जहाजेही

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सुरक्षित येतील, अशी आशा व्यक्त होत आहे. भारताकडे येणाऱ्या जहाजांमध्ये कच्चे तेल, एलएनजी, एलपीजी तसेच खतांसाठी आवश्यक असलेला कच्चा माल मोठ्या प्रमाणात आहे. युरिया, डीएपी, सल्फर आणि अमोनिया यांसारख्या कृषी क्षेत्रासाठी महत्त्वाच्या वस्तूंचा पुरवठा या जहाजांमुळे सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आगामी हंगामाच्या दृष्टीने हा पुरवठा महत्त्वाचा मानला जात आहे. भारताच्या ऊर्जा गरजांपैकी मोठा हिस्सा पश्चिम आशियातून पूर्ण केला जातो. विशेषतः कच्चे तेल, स्वयंपाकाचा गॅस आणि नैसर्गिक वायू यांची आयात मोठ्या प्रमाणात होर्मुज सामुद्रधुनीमार्गे होते.

## भारतीय बनावटीच्या टॉमहॉक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

■ भुवनेश्वर

**निर्भय** क्षेपणास्त्राच्या अयशस्वी प्रयोगानंतर संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) आज केलेली भारतीय बनावटीच्या टॉमहॉक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी झाली. अमेरिकेच्या टॉमहॉक क्षेपणास्त्राची ही भारतीय आवृत्ती आहे. लांब पल्ल्याच्या या क्षेपणास्त्राने १ हजार किलोमीटर अंतरावरील लक्ष्याचा अचूक भेद केला. ओडिशाच्या चांदिपूरमधील इंटरमिजिएट टेस्ट रेंज (आयटीआर) येथे ही चाचणी करण्यात आली. याबाबत माहिती देताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, या क्षेपणास्त्राला अद्याप नाव देण्यात आलेले नाही. परंतु अयशस्वी ठरलेल्या निर्भय क्षेपणास्त्राचीच ही सुधारित आवृत्ती आहे. निर्भयमधील सर्व दोष निवारण करून हे क्षेपणास्त्र विकसित करण्यात आले आहे. पुढील दोन वर्षांत या क्षेपणास्त्राच्या एकूण चार वेळा चाचण्या घेण्यात येतील. त्या यशस्वी झाल्यानंतरच क्षेपणास्त्र भारतीय हवाई दलात समाविष्ट करण्यात येईल.

## मुस्लीम विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला बोरीवलीतील शाळेची आयोगाकडून दखल

■ मुंबई

**मुंबईच्या** पश्चिम उपनगरांतील बोरिवली येथे बोरीवली एज्युकेशन सोसायटीच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सेठ गोपालजी हेमराज हायस्कूलमध्ये मुस्लीम विद्यार्थ्यांना त्यांचा धर्म पाहून प्रवेश नाकारण्यात आल्याचा आरोप होत आहे. राज्य अल्पसंख्याक आयोगाने या प्रकरणाची सूमोटो दखल घेतली असून, संबंधित शिक्षण संस्थेकडून प्रवेशाच्या नोंदी, व्यवस्थापनाचे धोरण आणि प्रवेश नाकारलेल्या पालकांचे जबाब मागवले आहेत.

तसेच अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वासिम बुरहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे बोरीवली एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने वकील योगेश याज्ञिक यांनी सांगितले की, भजनलाल नर्सरी स्कूल ही स्वतंत्र शाळा आहे. तसेच आर जी बगारिया शाळेतील इयत्ता पहिलीच्या सर्व जागा भरल्या आहेत. आम्ही पालिकेच्या शिक्षण विभागाला याबाबत लेखी उत्तर पाठवले आहे. सेठ गोपालजी हेमराज हायस्कूलच्या आवारात भजनलाल स्कूल आणि आर जी बगारिया स्कूल या दोन शाळा आहेत.

## पवनराजे हत्या खटल्याचा २० जून रोजी निकाल

■ मुंबई

**धाराशिवचे** (उस्मानाबाद) काँग्रेसचे नेते पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणी अंतिम निकाल आज विशेष सीबीआय न्यायालयाने चार दिवस पुढे ढकलला. आता २० जून रोजी निकाल दिला जाणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे खटल्यातील मुख्य आरोपी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपी आज न्यायालयात हजर असूनही काही कारणाने न्यायाधीशांनी निकाल घोषित करण्याची तारीख पुढे ढकलली.

तब्बल वीस वर्षांनंतर आज या प्रकरणी अंतिम निकाल येण्याची अपेक्षा होती. सुनावणीला हजर राहण्यासाठी पद्मसिंह पाटील मुंबईतील हॉटेलमध्ये मुक्कामास आले होते. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांना व्हिलचेअरवर बसवून रुग्णवाहिकेतून न्यायालयात आणण्यात आले. मयत पवनराजे यांचे पुत्र शिवसेना उबाठाचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर हेदेखील निकाल ऐकण्यासाठी न्यायालयात हजर होते.

**न्याय मिळेल ही अपेक्षा - ओमराजे निंबाळकर**

गेली वीस वर्षे आमच्या कुटुंबाने जो कायदेशीर लढा दिला त्याला योग्य न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. या देशात सर्वसामान्यांना न्याय मिळणे दुरापास्त आहे. माझ्यात क्षमता होती म्हणून मी उच्च न्यायालयात गेलो. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला आणि आज हा खटला निकालाच्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. आज निकाल ऐकण्याच्या अपेक्षेने न्यायालयात आलो होतो. पण न्यायालयाने निकाल चार दिवस पुढे ढकल्याने वाट पाहण्याशिवाय आमच्या हाती काही नाही. माझा न्यायदेवतेवर विश्वास आहे. त्यामुळे न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे, असे ओमराजे निंबाळकर म्हणाले.

## ५६,००० हून अधिक भारतीय तंत्रज्ञ नव्या नोकऱ्यांच्या शोधात

■ लंडन

**जागतिक** स्तरावर सुरू असलेल्या मोठ्या कर्मचारी कपातीमुळे ५६,००० हून अधिक भारतीय तंत्रज्ञ सध्या नवीन नोकऱ्यांच्या शोधात आहेत. हे प्रमाण केवळ एका महिन्यात जवळपास ४ पटीने वाढले आहे. ज्यामुळे आधीच संकटात असलेल्या भारतीय जॉब मार्केटमध्ये स्पर्धा तीव्र झाली आहे.

स्टाफिंग फर्म एक्सफेनोच्या अभ्यासानुसार महिन्याभरापूर्वी हा आकडा १२,००० हून अधिक होता. ६ महिन्यांपूर्वी नोकरी शोधणाऱ्यांची संख्या ५,००० होती. या अभ्यासात मेटा, ॲमेझॉन आणि ओरॅकल यासारख्या कंपन्यांचा समावेश होता. ज्यांनी अलीकडेच मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात केली. टेक कंपन्या आता मॅन्युअल कोडिंग आणि सपोर्ट भूमिकांसाठी मानवी बळाऐवजी एआय आणि ऑटोमेशनचा वापर वाढवत आहेत. जागतिक स्तरावर प्रत्येकी १,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना कमी करणाऱ्या २० प्रमुख टेक कंपन्यांमधील भारतीय कर्मचारी सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. नोकरी गमावणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने मध्यम-स्तर व्यवस्थापन आणि एंट्री-लेव्हल कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## आजगावात मायनिंगसाठी ड्रोन सर्व्हे ग्रामस्थांनी जेएसडब्ल्यूच्या पथकाला रोखले

■ सावंतवाडी

**आजगाव** व दशक्रोशी परिसरात प्रस्तावित मायनिंग प्रकल्पासाठी सुरू असलेल्या ड्रोन सर्व्हेक्षणाने मोठे वादळ निर्माण केले. जेएसडब्ल्यू कंपनीच्या सर्वेक्षण पथकाला ग्रामस्थांनी थेट जाब विचारत विठोबा मंदिर परिसरात आणल्यानंतर परिसरातील वातावरण अक्षरशः पेटले. ग्रामस्थांचा संताप, सर्वेक्षण कर्मचाऱ्यांची धावपळ आणि पोलिसांचा वाढता बंदोबस्त यामुळे परिस्थिती कोणत्याही क्षणी नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसू लागली होती.

आमच्या जमिनी, आमची गावे व आमच्या भवितव्याचा निर्णय आमच्याशी चर्चा न करता कोण घेत आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी केला. ड्रोन सर्व्हेक्षणामागे नेमके कोणाचे हितसंबंध आहेत याचाही जाब विचारला. संघर्षाची ठिणगी भडकण्याआधीच शिवसेना जिल्हाप्रमुख संजू परब यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची सूत्रे आपल्या हाती घेतली. संतप्त ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत त्यांनी सर्वेक्षण कर्मचाऱ्यांनाही भूमिका मांडण्याची संधी दिली.

**सहकार क्षेत्रातील तो नेता कोण?**

या सर्व प्रकरणात जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील एका प्रभावशाली नेत्याचे नाव ग्रामस्थांकडून वारंवार घेतले जात असल्याने संशयाचे वातावरण अधिक गडद झाले आहे. मायनिंगच्या हालचालींना राजकीय वा आर्थिक पाठबळ आहे का? संबंधित नेत्याची नेमकी भूमिका काय? असे प्रश्न आता उघडपणे विचारले जाऊ लागले आहेत.

## कुंभमेळा समन्वयकपदी मुख्यमंत्री कक्षाचा अधिकारी

■ मुंबई

**राज्य** शासनाने पुढील वर्षी होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची 'कुंभमेळा समन्वयक' म्हणून नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्याकडून १२ जून रोजी याबाबतचा अधिकृत आदेश जारी करण्यात आला. या विशाल कुंभमेळा सोहळ्याचे आयोजन शांततेत आणि यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध आखाड्यांचे व्यवस्थापन, साधू-महंत, कुंभमेळा प्राधिकरण, स्थानिक जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि राज्य सरकार या सर्व घटकांमध्ये सातत्याने आणि २४ तास समन्वय असणे अत्यंत आवश्यक असते. या सर्व यंत्रणांमध्ये योग्य सुसंवाद राखणे, त्यांच्या अडीअडचणी वेळेत सोडवणे आणि संपूर्ण नियोजनात कुठेही त्रुटी राहू नये म्हणून सुसूत्रता आणण्यासाठीच रामेश्वर नाईक यांच्यावर ही 'समन्वयक' म्हणून विशेष जबाबदारी सोपवली आहे.

## कल्याणी उद्योग मालकांचा वाद कोर्टाने मध्यस्थी घेण्याचे सुचवले

■ नवी दिल्ली

**भारतातील** प्रसिद्ध उद्योगपती कल्याणी कुटुंबातील भावंडांमध्ये दीर्घकाळ सुरू असलेल्या वारसाहक्काच्या आणि कंपन्यांतील हिस्सेदारीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी मध्यस्थीचा मार्ग स्वीकारण्याचा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने दिला. या मालमत्तेची किंमत एक लाख कोटी रुपयांहून अधिक असल्याचा अंदाज आहे. मुख्य न्या. सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने पुढील सुनावणी १३ जुलै रोजी ठेवली आहे.

भारतातील प्रसिद्ध उद्योगपती आणि कल्याणी समूहाचे संस्थापक डॉ.



नीलकंठराव कल्याणी यांची बाबासाहेब एन. कल्याणी, सुगंधा हिरेमठ आणि गौरीशंकर कल्याणी ही मुले आहेत. त्यांच्यात कौटुंबिक आणि मालमत्ता वाटपाबाबत विवाद निर्माण झाला आहे. बाबासाहेब एन. कल्याणी हे कल्याणी समूहाचे अध्यक्ष आणि अब्जाधीश प्रवर्तक आहेत. जागतिक पातळीवरील आघाडीची फोर्जिंग कंपनी असलेल्या भारत फोर्जचे ते नेतृत्व करतात. सुगंधा हिरेमठ या बाबा कल्याणी यांच्या भगिनी असून, रासायनिक क्षेत्रातील हिकल लिमिटेड कंपनीच्या सह-प्रवर्तक व संचालक आहेत. गौरीशंकर कल्याणी हे बाबा कल्याणी आणि सुगंधा हिरेमठ यांचे लहान भाऊ असून, ते कल्याणी समूहाशी जोडलेले आहेत.

## अमेरिका-रशिया हवाई दलांची २ अण्वस्त्रवाहू विमाने कोसळली

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** आणि रशियाच्या हवाई दलांची दोन विशेष लढाऊ विमाने आज काही तासांच्या अंतराने कोसळली. या दुर्घटनांत एकूण ८ जणांचा मृत्यू झाला.

अमेरिकेच्या हवाई दलाचे बी-५२ बॉम्बर हे अण्वस्त्रवाहू लढाऊ विमान सकाळी स्थानिक वेळेनुसार ११.२० वाजता कॅलिफोर्निया येथील एडवर्ड तळावरून उड्डाण करताच काही क्षणातच कोसळले. कोसळताच विमानाचा स्फोट झाला आणि आगीचा भडका उडाला.

**८ कर्मचाऱ्यांचा मृत्यू**

या अपघातात विमानातील सर्वच्या सर्व आठ कर्मचारी मरण पावले. आठ इंजिन असलेले हे विमान ८०० कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आले होते. हे अमेरिकेचे सगळ्यात महागडे विमान समजले जाते. अण्वस्त्र आणि पारंपरिक शस्त्रास्त्रे वाहून नेण्यासाठी या विमानाचा वापर करण्यात येत होता. अमेरिकेत हा अपघात झाल्यानंतर काही तासांतच रशियाच्या हवाई दलातील टीयू-२२एम ३ बॉम्बर लढाऊ विमानाचा अपघात झाला. सैबेरियाच्या इरकुत्सक परिसरात हे विमान कोसळले. सुदैवाने वैमानिकासह चार कर्मचारी अपघाताच्या काही क्षण आधी विमानातून बाहेर पडले. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

## महादेवी हत्तीण महिनाभरात वनतारातून नांदणीत परतणार?

**शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील महादेवी उर्फ माधुरी हत्तीणीचा नांदणीत परतण्याच्या हालचालींना तब्बल वर्षभरानंतर वेग आला आहे. पुढील महिनाभरात माधुरी नांदणीत परतण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुजरातमधील वनतारा संस्थेचे पथक काल नांदणीत दाखल झाले होते.**

■ कोल्हापूर

**पथकाने** माधुरीसाठी उभारण्यात येत असलेल्या पुनर्वसन केंद्राची पाहणी केली. यावेळी नांदणी मठातील पदाधिकारी उपस्थित होते. माधुरीच्या पुनर्वसनासह सुरक्षित पुनरागमनाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र शासन, नांदणी मठ आणि वनतारा यांच्यात सकारात्मक घडामोडी सुरू असल्याने माधुरीच्या परतीच्या आशा वाढल्या आहेत. २८ जुलै २०२५ रोजी माधुरीला वनतारा येथे हलविण्यात आले होते. त्यावेळी कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यभरातून भावुक प्रतिक्रिया उमटल्या होत्या. लाखो नागरिकांनी तिच्याविषयीच्या भावना व्यक्त करत तिच्या



पुनरागमनाची मागणी केली होती.

गेल्या वर्षभरापासून माधुरीला पुन्हा नांदणीत आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते.

## माहिती अधिकार कार्यकर्ता हा नवीन धंदा झाला आहे

**सुप्रीम कोर्टाची कठोर टिप्पणी**

■ नवी दिल्ली

**माहिती** अधिकार (आरटीआय) कार्यकर्ता असणे हा आता नवा धंदा बनला आहे. जो उठतो तो सरकारकडे माहिती विचारत सुटतो. मिळालेल्या माहितीचा गैरवापर संबंधितांना घाबरवून त्यांच्याकडून पैसा उकळण्यासाठी केला जातो, अशी कठोर टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने एक आरटीआय कार्यकर्ता आणि त्याच्या साथीदाराला अटकपूर्व जामीन देण्यात नकार दिला.

एका रस्त्याच्या बांधकामासंबंधी आरटीआय कार्यकर्ते राकेश कुमार बहल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे कंत्राटदाराला दमदाटी केली होती. कंत्राटदाराने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी बहल आणि त्यांच्या साथीदाराविरूद्ध खटला दाखल केला. या प्रकरणी बहल आणि साथीदारांनी सर्वोच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

न्या. संदीप मेहता आणि न्या. विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने सध्याच्या काळात आरटीआय कार्यकर्ता असण्याला काही लोकांनी चक्क व्यवसायाचे रुप दिले आहे. तसेच रस्ता बांधकामाच्या देखरेखीचे किंवा ते तपासण्याचे अधिकार तुम्हाला कोणी दिले, असा रोखठोक सवाल न्यायालयाने विचारला.